
स्वातंत्र्यशाहीर शि. म. परांजपे वाङ्मयमाला १

# स्वतंत्रतेसाठीं आत्मयज्ञ



किं. 2 आणे

य. गो. जोशी प्रकाशन, पुणें

IRBK-0102616
IRBK-0102616

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का वा
दा. क्र. २६७६

दा-७-२५१८

◆ ◆ स्वातंत्र्य-शाहीर शि. म. परांजपे वाङ्मय माला ◆ ◆

# स्वतंत्रतेसाठीं आत्मयज्ञ

[ स्वित्झर्लंडची स्वातंत्र्यकथा ]

अनुक्रम १७७८९
विभाग
क्रमांक
नो. १६२१-५-५
२९९६
बां.वा.
IRBK-0102616
IRBK-0102616

प्रस्तावना :

प्रा. शं. दा. चितळे, एम्. ए., बी. टी.

★

प्रथमावृत्ति

१ जानेवारी १९४७

किंमत १२ आणे

एकमेव विक्रेते :

◆ ◆ चित्रशाळा प्रेस, सदाशिव, पुणें २ ◆ ◆

प्रकाशक: यशवंत गोपाळ जोशी,
६२३ सदाशिव, पुणें २.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

मुद्रक: श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें २

अनुक्रम ९७५८९
विभाग
क्रमांक
नों. दि.
शाखा

# प्रकाशकाचें निवेदन

कॉंग्रेस सरकारच्या कृपेनें स्वातंत्र्यशाहीर शि. म. परांजपे यांचे काळांतील निवडक निबंध भाग १ ते १० बंधमुक्त झाले. त्यांतच शिवरामपंत परांजपे यांचें बेळगांव साहित्यसंमेलनाचें भाषण व इतर पुस्तकरूपानें प्रसिद्ध व्हावयाचे राहिलेले कांहीं लेख यांची भर घालून साहित्यसंग्रह भाग ३ रा अशीं एकूण अकरा पुस्तकें मीं प्रसिद्ध केलीं. कागद-टंचाईमुळें या तेजस्वी पुस्तकांची जेवढी आवृत्ति काढणें अवश्य होतें तेवढी काढणें अशक्य झालें म्हणून हीं आकराही पुस्तकें एका गटानें विकण्याचें ठरविलें.

परंतु अनेक ग्राहकांची ग्राहकशक्ति इतकी मोठी नसल्यामुळें अनेकांना या वाङ्मयाचा लाभ घेतां येणें अशक्य झालें. म्हणून अडचण व थोडी नुकसानी सोसूनही सुटे भाग विकण्याचें ठरवावें लागलें.

इतक्यांत कांहीं शाळांतील शिक्षकांनीं येवढीं मोठ्या किंमतीचीं पुस्तकें विद्यार्थ्यांना बक्षीससमारंभांत वांटणें अवश्य असलें तरी अशक्य होईल, तेव्हां बक्षीससमारंभाला उपयोगी पडतील अशीं छोटीं छोटीं पुस्तकें विषयवारीनें थोडक्या किंमतींत काढलीं तर विद्यार्थ्यांच्या हातीं हें तेजस्वी वाङ्मय सहजतेनें जाईल अशी सूचना केली.

त्यावरून खास विद्यार्थ्यांकरितां अशीं छोटीं छोटीं पुस्तकें काढण्याचें ठरवून "स्वातंत्र्य-शाहीर शि. म. परांजपे वाङ्मय-माला" प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. त्या मालेचेंच हें पहिलें पुस्तक होय.

काळांतील निवडक निबंध भाग १ ते १० यांमधून अशीं सुमारें चाळीस तरी पुस्तकें निघतील. तीं यथावकाश प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे.

या मालेंतील दुसरें पुस्तक बहुधा फेब्रुवारी १९४७ मध्यें प्रसिद्ध करण्याचा मानस आहे. तरी शाळांनीं बक्षीससमारंभांत हें तेजस्वी वाङ्मय विद्यार्थ्यांच्या हातीं द्यावें अशी विनंति आहे.

हें पुस्तक छापखान्यांत छापण्यास दिलें त्याच वेळीं माझे स्नेही श्री. दा. पां. रानडे, व्यवस्थापक, चित्रशाळा–प्रकाशनविभाग, यांनीं या सर्व पुस्तकांच्या विक्रीची जबाबदारी पत्करली. या त्यांच्या सहकार्यामुळें ही वाङ्मयमाला शक्य तितक्या लौकर पुरी होईल अशी उमेद वाटते.

"स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ" या पुस्तकांत प्रसिद्ध केलेले चार लेख काळांतील निवडक निबंध भाग ९ मधील असून "स्वित्झर्लंडची स्वतंत्रता" नं. १, २, ३ असे ता. ७, १४ व २१ डिसेंबर १९०६ रोजीं 'काळ'मध्यें प्रसिद्ध झालेले आहेत व चौथा लेख "स्वतंत्रतेसाठीं आत्मयज्ञ" या नांवाखालीं ता. २८-१२-१९०६ रोजीं 'काळ'मध्यें प्रसिद्ध झाला होता.

या विषयास पूर्तता आणण्याकरितां माझे स्नेही प्रा. शं. दा. चितळे यांना 'स्वित्झर्लंड' विषयीं अधिक माहिती लिहिण्यास विनंति केली व ती त्यांनीं मान्य करून लिहून दिली ती या पुस्तकाला 'प्रास्ताविक' म्हणून जोडिली आहे. या पुस्तकाचा बक्षीससमारंभाकरितां व स्थूल वाचनाकरितां म्हणून शाळांतील शिक्षकांनीं उपयोग केल्यास शिवरामपंतांचें तेजस्वी वाङ्मय नवीन पिढींत व घरोघर जाऊं शकेल!

पुणें
१–१–१९४७

यशवंत गोपाळ जोशी

# आजचें स्वित्झर्लंड

## ४० लक्ष वस्तीचा देश

स्वित्झर्लंड हा मूलतः एक देश नव्हता, परंतु ' स्विस ' लोकांच्या आसपासचे प्रदेश त्यांत सामील होऊन हा देश अस्तित्वांत आला. यांत इ. स. १२९१ मध्यें तीन परगणे होते; सध्यां ही संख्या २२ आहे. इतके प्रांत होऊनही या देशाची लोकसंख्या अवघी ४० लक्ष आहे. त्याचें क्षेत्रफळ १५,९७५ चौरस मैल आहे. या देशाची दक्षिणोत्तर रुंदी जास्तींत जास्त १,९३७ मैल आणि पूर्व-पश्चिम लांबी २२६॥ चौरस मैल आहे. या देशाच्या-सभोंवतीं फ्रान्स, जर्मनी, इटली या देशांचें वेष्टण आहे. समुद्रकांठीं प्रवेशद्वार या देशाला नाहीं.

## विविधता—तीन भाषा

लोकसंख्या आणि विस्तार या दृष्टीनें हा देश लहान असूनही त्यांत विविधता फार आहे. येथें मुख्यतः तीन भाषा बोलणारे लोक आहेत. जर्मन, फ्रेंच आणि इटालियन या त्या तीन भाषा होत. या तीनही राष्ट्रभाषा आहेत, म्हणजे सरकारी कारभार तिन्ही भाषांत चालतो. विधिमंडळांत कोणत्याही भाषेंत बोललें तरी चालतें. सरकारी आज्ञापत्रें तीन्ही भाषांत प्रसिद्ध होतात. यांत समाधान एकच आहे कीं, तिन्ही भाषांची लिपि एकच म्हणजे रोमन लिपि आहे. भाषाभिन्नतेच्या जोडीस लिपिभिन्नता नाहीं !

## आणि चौथी भाषा

जर्मनभाषी जनता प्रमाणतः अधिक आहे. जर्मन, फ्रेंच, इटालीयन या भाषांखेरीज आणखी एक चौथीच भाषा बोलणारे लोक ' ग्रिसोन्स ' या परगण्यामध्यें आहेत. त्या भाषेचें नांव रोमान्सवलेडिन. फ्रेंच-इटालीयन भाषांशीं या भाषेचें फार साम्य आहे. या भाषेंत कांहीं साहित्य आहे, पण राजभाषा होण्याचा मान तिला मिळालेला नाहीं.

## अनेक धर्मपंथ

भाषाभिन्नतेप्रमाणें धर्मपंथांची भिन्नता या भूमींत आहे. प्रॉटेस्टंट शें. ५८ असून कॅथॉलिक पंथीय शें. ४० आहेत. ज्यू वगैरे इतर धर्मीयही थोडे आहेत.

या सर्वांना धार्मिक मतस्वातंत्र्य राज्यघटनेंत दिलेलें आहे. पंधराव्या शतकांतील धर्मसुधारणेची चळवळ या देशांत होऊन बहुसंख्याक लोक प्रॉटेस्टंट झाले.

## सरोवरें, धबधबे आणि हिमनद्या

स्विस लोकांच्या देशावर निसर्गाची कृपा आहे. एकीकडे उंच डोंगरांची रांग तर त्याच्या पायाशीं असलेल्या प्रदेशांत विस्तीर्ण नि खोल सरोवरांची रांग. चौदा सरोवरें एवढीं मोठीं आहेत कीं, प्रत्येकाचें क्षेत्रफळ ४ चौरस मैलांपेक्षां अधिक आहे. जिनेव्हा व कान्स्टन्स हीं सर्वांत मोठीं सरोवरें होत.

सरोवरांप्रमाणें असंख्य धबधबे वाहत असतात. अत्यंत उंचावरून खालीं पाणी पडत आहे, परंतु पाण्याची धार अगदीं अरुंद असलेले असे कांहीं धबधबे आहेत, तर थोड्या उंचावरून खालीं उडी मारणारे पण रुंद प्रवाह असलेले कांहीं धबधबे पाहून मन आल्हादित होतें. सरोवरें व धबधबे यांच्या जोडीस दाट झाडींचीं जंगलें आहेत. बर्न, ग्रीसोन्स, टिसिनो हे परगणे म्हणजे जंगलमय.

हिमालयाच्या खालोखाल उंच असा आल्प्स पर्वत या देशांत इतस्ततः पसरलेला आहे. त्याचें १५,७८२ फूट उंचीचें ( मॉंटरोझाचें ) डुफोरास्पिलन हें शिखर स्वित्झर्लंडमध्येंच आहे. या पर्वताच्या शिखरावर बर्फ पडत असल्यानें १ हजारपर्यंत हिमनद्या या पर्वताच्या रांगांवरून वाहत जातात. ग्रेट अलेस्क या हिमनदीची लांबी १६॥ मैल आहे.

## युरोपचें 'नंदनवन'

बर्फ, डोंगर, सरोवरें, नद्या, यांमुळें सृष्टिशोभा अवर्णनीय असते. सूर्यास्ताचा देखावा पाहून कोणीही मनुष्य आपलीं सर्व दुःखें क्षणभर विसरून जातो. या सृष्टिशोभेबरोबरच येथील हवा निरोगी आहे. यामुळें सर्व जगांतून कित्येक हौशी लोक या देशांत प्रवासासाठीं येतात. गिर्यारोहण करणें, सरोवरांतून विहार करणें आणि मनःशांति प्राप्त करणें हाच त्यांचा उद्देश. या प्रवाशांच्या सुखसोयींसाठीं डोंगरावर आणि सरोवरांच्या कांठीं विश्रांतिगृहें चालविणें, वाटाड्याचें काम करणें हा कांहीं स्विस लोकांचा व्यवसाय झाला आहे; इतकी पांथस्थांची गर्दी या देशांत येत असते. हा देश आज युरोपचें नंदनवन समजला जातो.

## उद्योगी स्विस

स्विस लोकाचे उद्योगधंदे पुष्कळ आहेत. खोऱ्यांतून शेती केली जाते. हे शेतकरी बकऱ्या व गाई पाळतात आणि दुधाचे अनेक पदार्थ तयार करितात. हिंवाळ्यांत डोंगरावर बर्फ असतें तेव्हां खोऱ्यांमध्यें हीं गुरें चरतात, आणि उन्हाळ्यांत डोंगरावर जें सुंदर गवत उगवतें तें तीं खातात. शेतीखेरीज दूधापासुन 'चीझ', 'लोणी', गोठलेलें दूध या वस्तु शेतकरी तयार करतात. या वस्तु परदेशांतही पाठविल्या जातात.

शेतीखेरीज कारखान्यांतही लहान पण महत्त्वाचीं यंत्रें, म्हणजे शास्त्रीय उपकरणें, दुर्बिणी, सूक्ष्मदर्शक यंत्रें, स्विस लोक करतात. घड्याळें करण्यांत ते कुशल आहेत. बाजाच्या पेट्या आणि विजेचीं यंत्रें तयार करण्याचे कारखाने तेथें आहेत. जंगलांतील लांकडे तोडून त्यांवर कोरीव काम करणें व कशिदे काढणें, या कलाकुसरीबद्दल स्विस लोकांची प्रसिद्धि आहे.

## विजेवर चालणारे कारखाने

स्वित्झर्लंड डोंगराळ असल्याकारणानें वाहतुकीची अडचण फार. डोंगरांतील जलप्रवाहाच्या साहाय्यानें वीज तयार करून तिच्या जोरावर चालणाऱ्या 'आगगाड्या' येथें आतां पुष्कळ आहेत. याच विजेच्या साहाय्यानें कारखाने चालतात. कारण कोळशाचा या देशांत अभाव आहे. वजनानें हलक्या पण किंमतीनें भारी वस्तु बनविण्याकडे स्विसांचा कल आहे, आणि या वस्तु तयार करण्यास लागणारी चिकाटी नि बुद्धि-कौशल्य त्यांच्यांत असल्यानें त्यांनीं यश मिळविलें आहे.

## आदर्श शिक्षण

स्विस लोक उद्योगी नि हरहुन्नरी आहेत याचें कारण कांहींच्या मतें तेथील शैक्षणिक व्यवस्था होय. देशभर प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचें करण्यांत आलें आहे. हें शिक्षण संपल्यावर धंदेशिक्षण देणारीं विद्यालयें असून सात मोठीं विद्यापीठें आहेत. वाङ्मय-शास्त्राप्रमाणें धंदेशिक्षणास या विद्यापीठांत मान-मान्यता आहे.

* * *

## पांच शतकांचा झगडा

तेराव्या शतकापासून स्विस लोकांनीं स्वातंत्र्यार्थ यत्न सुरू केला आणि एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं तो पूर्ण यशस्वी झाला. कधीं ऑस्ट्रियाशीं, कधीं

जर्मनीशीं तर कांहीं वेळेस फ्रान्सशीं त्यांना झगडा करावा लागला. या देशांची सत्ता स्वित्झर्लंडमधील कांहीं परगण्यांवर असे, पण ती बव्हंशीं नाममात्र असे. फ्रेंच क्रांतिकारक आणि नेपोलियन यांनीं मात्र कांही काळ स्विस लोकांचें स्वातंत्र्य हिरावून घेतलें, पण नेपोलियननंतर हा देश पूर्ण स्वतंत्र झाला आणि आजही आहे. ४-५ शतकांतील मारगार्टेन, सेम्पॅक, ग्रँडसन आणि मोरात या ठिकाणीं 'स्विस' लोकांनीं थोड्या लोकांनिशीं बहुसंख्य शत्रूचा पराभव करून युरोपला दिपविलें.

## १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत

या कालापासून स्वित्झर्लंडचीं स्वातंत्र्ययुद्धें संपलीं. कारण या देशाचें स्वातंत्र्य इतर राष्ट्रांनीं मान्य केलें. युद्धकालांतही या राष्ट्रावर हल्ला करावयाचा नाहीं हें बंधन युरोपियन राष्ट्रांनीं मान्य केलें. मागच्या महायुद्धांत या राष्ट्रावर हल्ला झाला नाहीं. गेल्या महायुद्धांत तसें कांहीं जर्मनी करील असें वाटलें होतें, पण प्रत्यक्षांत हिटलरनेंही या राष्ट्राच्या तटस्थतेस मान्यता दिली एवढें खरें!

गेल्या दीड दोन शतकांत मिळालेल्या शांततेचा उपयोग मानवी कल्याणासाठीं स्वित्झर्लंडनें केला. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांचा जन्म या देशांत झाला आहे. युद्धक्षेत्रांतील जखमी लोकांचे शुश्रूषा करणारे डॉक्टर, नर्स, दवाखाने यांना कोणींही त्रास देऊं नये अशी चळवळ इ. स. १८६४ त स्वित्झर्लंडनें सुरू केली आणि ती योजना आतां सर्वमान्य झाली आहे. आंतरराष्ट्रीय पोस्टल यूनियनची स्थापना 'बर्न' येथें करण्यांत आली. तेव्हांपासून एका राष्ट्रांतील नागरिकांची पत्रें दुसऱ्या राष्ट्रांत पाठविण्याचा उपक्रम सुरू झाला. मजुरांचे सार्वत्रिक प्रश्न सोडविण्याची आंतरराष्ट्रीय मजूर-परिषद भरविण्याचें कार्य याच देशांत सुरू झालें. युद्धांत पंगु झालेल्या शिपायांच्या कुटुंबियांच्या मदतीसाठीं संस्था स्थापन करण्याचा मान १८८६ सालीं या राष्ट्रानें मिळविला. १९१४-१८ च्या महायुद्धानंतर जन्मास आलेल्या राष्ट्रसंघाचें मुख्य कार्यालय अखेरपर्यंत जिनेव्हा या स्विस शहरींच होते.

## हद्दपारांचें आश्रयस्थान

या तटस्थतेचा उपयोग स्विस लोकांनीं आणखी एका सत्कार्यीं केला आहे. कोठल्याही राष्ट्रांतून हद्दपार झालेल्या लोकांना स्वित्झर्लंडनें आजपर्यंत आश्रय दिलेला आहे, किंबहुना हा आपला अधिकार आहे असें स्विस लोक मानतात.

Right of Asylum किंवा हद्दपारांचें संरक्षण करण्याचा अधिकार अमलांत आणण्यासाठा प्रसंगोपात्त लहानमोठ्या राष्ट्रांचा राग या देशानें आपणावर ओढवून घेतला आहे. इ. स. १८३० ते १८४८ च्या स्वातंत्र्याच्या चळवळींत तर अनेक हद्दपार देशभक्त या देशांत वास्तव्य करीत होते. प्रसिद्ध इटालियन क्रांतिकारक मॅझिनी कित्येक वर्षें या देशांत होता. फ्रँको-जर्मन युद्धांत दोन्ही-कडील शरणागतांना स्वित्झर्लंडनें अभयदान दिलें आणि ही परंपरा अद्यापही चालू आहे. यामुळें कांहीं राष्ट्रांना स्वित्झर्लंडचा राग आला, पण त्यांच्याचपैकीं काहींना या देशाचा आश्रय घ्यावा लागण्याचे प्रसंग आले, तेव्हां स्विस हे खरोखर तटस्थ आहेत असें त्यांस आढळून आलें आणि त्यांचा गैरसमज दूर झाला.

## युद्धसज्ज तटस्थता

युरोपियन देशांच्या– जर्मनी, ऑस्ट्रिया, फ्रान्स, इंग्लंड यांच्या—प्रतिस्पर्धेमुळें या देशाची तटस्थता त्यांनीं मान्य केली आहे; हें जरी खरें असलें तरी मनुष्याच्या मनांत जी सहानभूति असते तीही या राष्ट्रांच्या अंगीं थोडीबहुत असल्यानें हें ताटस्थ्य टिकण्यास मदत झाली आहे. पण याहीपेक्षां बलवत्तर कारण म्हणजे स्विस सरकारची लष्करी संघटना. या देशाला मुद्दाम कोणाशीं युद्ध करावयाचें नाहीं, पण कोणीं आक्रमण केलें तर त्याच्याशीं दोन हात केल्याशिवाय तें राष्ट्र राहावयाचें नाहीं. मागील महायुद्धांत जर्मनीनें बेलजमवर हल्ला केला तसा तो आपल्यावर होईल अशी शंका स्वित्झर्लंडला आली, म्हणून आपल्या सरहद्दीवर त्या सरकारनें कडक तयारी केली.

ही युद्धसिद्धता असावी म्हणून स्विस नागरिकांस वयाच्या २० ते ४८ वर्षांपर्यंत प्रसंग पडेल तर लष्करी नोकरीस बोलाविलें जातें. लष्करी शिक्षण घ्यावेंच लागतें. जे दुर्बल किंवा पंगु नागरिक असतील त्यांना लष्करी नोकरीपासून सूट मिळाली तरी त्यासाठीं नुकसानभरपाई म्हणून कर द्यावा लागतो. ५०,००० सैनिकांचें लष्कर नेहमींच तयार असतें, आणि केव्हांही २ लाखापर्यंत सैन्य खडें करतां येतें. हिंदुस्थानसारख्या ४० कोटि लोकसंख्येच्या देशांत शांतता-काळांत एवढेंच लष्कर असतें. स्वित्झर्लंडची लोकसंख्या १९२० सालीं ४० लक्षांपर्यंत होती. यावरून या तटस्थ देशाची लष्करी तयारी किती

चांगली आहे त्याची कल्पना येईल. या देशास तटस्थ राष्ट्र म्हणण्यापेक्षां 'युद्धसिद्ध पण तटस्थ राष्ट्र' असें म्हणणें अधिक उचित वाटतें.

* * *

## आजची राज्यघटना

स्वित्झर्लंडची राज्यघटना हा कुतूहलाचा विषय आहे. या लहान देशांत २२ कँटन किंवा परगणे आहेत आणि ते बव्हंशीं स्वतंत्र आहेत. त्या सर्वांचें मिळून संयुक्त राज्य किंवा फेडरेशन केलेलें आहे. जगांतील पहिलें फेडरेशन म्हणजे स्वित्झर्लंड होय.

इ. स. १ ऑगस्ट १२९१ मध्यें उरी, स्विस, निडवालडब या खोऱ्यांतील लोकांनीं आपला संघ स्थापिला. या तीन खोऱ्यांमध्यें इतर प्रदेशांचा कालांतरानें समावेश होत जाऊन आजचें स्वित्झर्लंड बनलेलें आहे. १३५२ मध्यें या नांवानें या भागाचा उल्लेख केला गेला आहे, पण १८०३ मध्यें नेपोलियननें या संघाचें स्वित्झर्लंड असें नांव व्यवहारांत आणलें, आणि आतां तें रूढ झालें आहे.

प्रत्येक खोऱ्याशीं स्वतंत्र करार करून त्यास संघांत सामील करून घेण्यांत आलें. कांहीं वर्षांनंतर या सर्वांच्या प्रतिनिधींनीं एकत्र जमून इ. स. १८४८ मध्यें आधुनिक स्वित्झर्लंडची घटना तयार केली. त्यामध्यें इ. स. १८७४ मध्यें थोडा फरक करण्यांत आला. सामान्यतः आजही तीच शासनपद्धति अस्तित्वांत आहे.

## अनेक पक्षांचें कारभारी मंडळ

'स्वित्झर्लंड' या संयुक्तराज्याचा कारभार करण्यासाठीं विधिमंडळाच्या दोन सभा आहेत : (१) **स्टँडेराट** (कौन्सिल ऑफ् स्टेट) या सभेंत प्रत्येक परगण्याचे—मग तो लहान असो कीं मोठा असो—२ प्रतिनिधि असतात. (२) **नॅशनल राट** (राष्ट्रीय मंडळ) या सभत स्वित्झर्लंडांतील परगण्यामधील लोकसंख्येच्या प्रमाणांत निवडून दिलेले प्रतिनिधि असतात. सामान्यतः २० हजार मतदारांना एक प्रतिनिधि या प्रमाणांत ही संख्या ठरविलेली आहे. या विधिमंडळाची म्हणजे दोन्ही सभांचीं अधिवेशनें बर्न येथें भरतात.

या दोन्ही सभाकडून तीन वर्षांसाठीं कार्यकारी मंडळ (किंवा प्रधानमंडळ) निवडलें जातें. यांत सात सभासद असतात. हें कारभारी मंडळ एकाच पक्षाचें

असावें असा नियम किंवा रूढि नाहीं, किंबहुना दोन्ही सभांत असलेल्या अनेक राजकीय पक्षांचे प्रतिनिधि त्यांत निवडले जातात. त्यांनीं मांडलेला ठराव नॅशनल राटमध्यें नापास झाला तरी हें कारभारीमंडळ त्यागपत्र देत नाहीं. इंग्लंडमधील प्रधानमंडळाची ( कॅबिनेटची ) पद्धति याहून निराळी आहे. आपल्याकडे प्रांतांत अशीं एकपक्षीय प्रधानमंडळें अस्तित्वांत आलेलीं आहेत. सर्व पक्षांतील पुढाऱ्यांचें प्रधानमंडळ असलें तर एकसूत्रीपणानें कारभार होणार नाहीं असें आपणांस वाटतें. पण स्विस मंत्रिमंडळांत असें सहसा घडत नाहीं. राज्यकारभाराच्या अंदाजपत्रकाला नॅशनल राटची संमति लागते आणि या सभेच्या धोरणाप्रमाणें साधारणपणें कारभार चालतो. स्वित्झर्लंडची घडणही तडजोडीनें झाली असल्यानें राज्यकारभारांत मंत्र्यांचीही हीच वृत्ति असते.

## राष्ट्राचा अध्यक्ष

कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षाची निवड दोन्ही सभांकडून प्रत्येक वर्षी केली जाते. या अध्यक्षाकडेच परराष्ट्रीय खातें कायमचें दिलेलें आहे. स्वित्झर्लंडच्या कारभाराचा मुख्य अधिकारी हा अध्यक्ष होय. अमेरिकेच्या प्रीसेडन्टप्रमाणें त्याला विशेष अधिकार नाहींत, पण त्याचा दर्जा तोच होय. हा राष्ट्राचा ' पहिला नागरिक ' मानला जातो.

## ' प्रांतिक स्वायत्तता '

स्वित्झर्लंडमधील ' कँटन ' हे अंतर्गत कारभारांत स्वतंत्र आहेत. त्यांच्या लोकसभा भरवून ते अध्यक्ष आणि कारभारी मंडळ निवडतात. युद्धकाला-सारख्या आपत्तीखेरीज त्यांच्यावर संयुक्त सरकारचा अधिकार चालत नाहीं. हे प्रांत फुटून निघूं शकत नाहींत. शिक्षण, शेती यांसारखे विषय पूर्णपणें प्रांतांच्या कक्षेत आहेत. ही प्रांतिक स्वायत्तता स्विस राष्ट्रीयतेला बाधक होणार नाहीं अशी तजवीज घटनेंत आहे. कँटनचें सरकार, नागरिक किंवा स्विस सरकार यांच्यांत घटनेच्या अर्थासंबंधीं मतभेद झाल्यास त्याचा निर्णय देण्या-साठीं २४ सभासदांचें एक कोर्ट किंवा ट्रायब्यूनल नेमलेलें असतें. या कोर्टाच्या निकालावर विधिमंडळाकडे अपील किंवा तक्रारअर्ज करतां येतो. यास फेडरल कोर्ट म्हटलें तरी चालेल.

## इनीशिएटिव्ह आणि रेफरेंडम

सर्वपक्षीय सरकार असणें हें स्विस राज्यघटनेचें एक वैशिष्ट्य आहे.

विभाग क्रमांक २१७४

आणखीं दोन वैशिष्ट्यें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत: एक म्हणजे इनीशिएटिव्ह ( Initiative ) आणि दुसरें रेफरेंडम ( Referendum ). एखादा कायदा करावा अशी लोकांची इच्छा असली तर त्याप्रमाणें ठराविक संख्येच्या स्वाक्षरीनें लोकांनीं सरकारकडे अर्ज करावयाचा. [ विधिमंडळांत कायद करण्याचें काम मुख्य होय, परंतु कांहीं वेळेला लोकांना हवा असलेला कायदा तेथें चर्चेलाही घेतला जात नाहीं. अशा वेळीं या 'इनीशिएटिव्ह'चा ('प्रारंभ करणाऱ्या हक्का'चा ) उपयोग स्विस नागरिक करूं शकतात. ] अशा प्रकारची सूचना नागरिकांनीं दिली म्हणजे कांहीं अवधीनंतर सर्व स्विस नागरिकांचीं मतें या प्रश्नावर घेतलीं जातात. बहुसंख्येनें अनुकूल मत पडल्यास तो कायदा पास होतो आणि इतर कायद्याप्रमाणें त्याची अमलबजावणी चालू होते. प्रतिकूल मतें अधिक पडल्यास ठराव नापास होतो.

याप्रमाणेंच '**रेफरेंडम**'चा अधिकार होय. सर्व जनतेचें मत एखाद्या प्रश्नावर घ्यावें असें स्विस कायदेमंडळाला वाटलें तर तो प्रश्न जनतेकडे सोंपविला जातो: जनतेकडे 'रेफर' केला जातो. म्हणून यास रेफरेंडम असें म्हणतात. नागरिकांनीं बहुसंख्येनें ठराव मान्य केल्यास तो पास झाला, आणि बहुमत विरुद्ध गेलें कीं तो कायदा नापास झाला असें मानतात.

## खरी लोकशाही

या दोन प्रकारांनीं—इनीशिएटिव्ह आणि रेफरेंडम यांनीं—प्रत्यक्ष नागरिकांनाच कायदा मांडण्याचा, तो पास करण्याचा किंवा नापास करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. एखाद्या देशांत लोकशाही आहे असें आपण म्हणतों, याचा सामान्य अर्थ असा आहे कीं, तेथील लोकांना प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार असून हे प्रतिनिधि कायदा करण्याचें काम करतात. आपले प्रतिनिधि निवडणें एवढेंच लोकांचें काम, आणि तेही ३ किंवा ५ वर्षांच्या अंतरानें. हीच स्थिति इंग्लंड, अमेरिका या प्रगत देशांत आहे. स्वित्झर्लंडनें याहीपुढें जाऊन विशेष प्रसंगीं लोकांनाच कायदे करण्याचा अधिकार दिलेला आहे.

आपल्या देशाच्या दृष्टीनें स्वित्झर्लंडमधील अनेक पक्षीय-कार्यकारी मंडळाची पद्धति ( कौन्सिल सिस्टिम ) महत्त्वाची होय. सर्व पक्षांना विश्वासांत घेऊन राज्यकारभार करावयाचा तर ही कौन्सिल सिस्टिम आवश्यक आहे असें

कांहीं पुढारी आपल्याकडे सांगतही आहेत. स्विस राज्यघटनेचा अभ्यास आपल्यास निःसंशय लाभकारक होईल.

* * *

## मनुष्य जन्मतःच स्वतंत्र आहे

अशा चिमुकल्या कुतूहलपूर्ण आणि निसर्गश्रीनें नटलेल्या देशाच्या इतिहासाकडे कोणाही रसिकाचें मन आकर्षित होईल. अर्थातच ज्याच्या प्रतिभेचा प्रकर्ष स्वातंत्र्य-लक्ष्मीचा जयजयकार करण्यांत होतो अशा रसिकवर कै. परांजप्यांनीं स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेचें गान करावें हें स्वाभाविकच होय. सदासर्वदा उपरोधिकपणें चालणारी पंतांची लेखणी सरळ मार्गानें पण उल्हासानें स्विस वीर वुइल्यम टेल, रोडाल्फ ब्रॉनर आणि स्टॉफाचर यांच्या कथा सांगण्यांत या लेखांतून तन्मय झाली आहे. स्वित्झर्लंडच्या निमित्तानें आपल्या देशबांधवांच्या मनांत स्वातंत्र्याची आकांक्षा निर्माण करण्यासाठीं स्वातंत्र्यशाहीरांनीं पुढील सिद्धांत स्पष्टपणें मांडला आहे : ‘ मनुष्यप्राणी हा परमेश्वरानें स्वतंत्रतेनें राहण्याकरितांच निर्माण केला आहे ! ’

## स्वातंत्र्याचा साहाय्यक परमेश्वर

स्वित्झर्लंड या डोंगराळ देशाला पण वस्तुतः महाराष्ट्राला मनांत आणून ते म्हणतात : “ डोंगरी मुलूख हीं स्वतंत्रतेचीं माहेरघरेंच होत.... जेथें जेथें डोंगर आहेत तेथें तेथें स्वातंत्र्येच्छु लोक उत्पन्न झालेच पाहिजेत....” ही वाक्यें वाचून हृदयांत खळबळ होत आहे तोंच पुढील वाक्य वाचक वाचतो: “ आपल्याला गुलामगिरी नको असा मनुष्याच्या मनानें निदिध्यास घेतला म्हणजे परमेश्वर त्यांना स्वतंत्रता देण्याला तयारच असतो. ”

या वाक्यावलींचें प्रात्यक्षिक ज्यांनीं केलें आणि आजही जो देश स्वतंत्र आहे, त्याचा इतिहास वाचल्यानें वाचक मंत्रमुग्ध होऊन जातो. आपण कोण आहों ? कोठें होतों ? आज काय अवस्थेंत आहों ? याचा विचार तो करूं लागतो. ही विचारजागृति करण्याचें सामर्थ्य इ. स. १९०६ सालीं या लेखांत जितकें होतें तितकेंच आजही आहे आणि पुढेंही राहील. स्वातंत्र्यगान ही अशीच अमूल्य वस्तु आहे, मग तें गान गतकालांतील स्वातंत्र्यसंग्रामाचें असो किंवा अलीकडील स्वातंत्र्ययुद्धाचें असो.

पुणें.<br>
दत्तजयंती, १८६८.

शं. दा. चितळे

अनेक वर्षांच्या अज्ञातवासानंतर विक्रीस तयार !

# काळांतील निवडक निबंध

| | | |
|---|---|---|
| भाग १ ला | किंमत ३॥ रुपये | पोस्टेज ६ आणे. |
| भाग २ रा | ,, ३॥ रुपये | ,, |
| भाग ३ रा | ,, ३॥ रुपये | ,, |
| भाग ४ था | ,, ४॥ रुपये | ,, |
| भाग ५ वा | ,, ५॥ रुपये | ८ आणे. |
| भाग ६ वा | ,, ४॥ रुपये | ,, |
| भाग ७ वा | ,, ४॥ रुपये | ,, |
| भाग ८ वा | ,, ४ रुपये | ,, |
| भाग ९ वा | ,, ४ रुपये | ,, |
| भाग १० वा | ,, ४ रुपये | ,, |
| साहित्यसंग्रह भाग ३ रा | ,, ४ रुपये | ,, |

## संपूर्ण कापडी बांधणी

हीं अकरा पुस्तकें आपणांकडून ४५ रुपये मनीऑर्डरीनें येतांच आपणांकडे आमचे खर्चानें पाठवूं.

सुटी पुस्तकेंही विकत मिळतील. आवृत्ति थोडी असल्यामुळें आजच मागणी करणें अवश्य आहे.

**व्यवस्थापक :**

य. गो. जोशी-प्रकाशन, ६२३।१५ सदाशिव, पुणें २.

# स्वतंत्रतेसाठीं आत्मयज्ञ

( स्वित्झर्लंडची स्वातंत्र्यकथा )

# स्वतंत्रतेसाठीं आत्मयज्ञ

## [ स्वित्झर्लंडची स्वातंत्र्य–कथा ]

## :: १ ::

### स्वतंत्रतेच्या हक्कासाठीं

सर्वच देशांचे स्वतंत्रतेचे इतिहास मोठे रमणीय असतात, परंतु त्यांत स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेच्या इतिहासाची रमणीयता विशेष आहे. जुलमाचा तिटकारा आणि स्वतंत्रतेची आवड या गोष्टी मनुष्याच्या अंतःकरणामध्यें नैसर्गिकरीत्याच उत्पन्न झालेल्या असतात. एखादा मनुष्य बहिरा, आंधळा, मुका किंवा लंगडा असेल, पण त्याला जुलमी राजाबद्दल त्वेष येत नसेल, किंवा स्वतंत्रतेची प्राप्ति आवश्यक वाटत नसेल, अशी गोष्ट आढळून येणें दुर्घट आहे. मनुष्यप्राणी हा परमेश्वरानें स्वतंत्रतेनें राहण्याकरितांच निर्माण केला आहे. दुसऱ्यांचीं जोखडें वाहण्याकरितां त्यानें मनुष्याला उत्पन्न केलें नाहीं. त्या कामाकरितां त्यानें बैल निर्माण केले आहेत. त्याची संपत्ति लोकांनीं लुटावी, त्याला राहण्याला घरदार मिळूं नये, पांघरण्याला वस्त्र उरूं नये, आणि खाण्याला अन्न असूं नये, अशी त्याची चोहोंकडून हालअपेष्टा करण्याकरितां परमेश्वरानें खात्रीनें त्याला जन्मास घालण्याचा हा उपद्व्याप केलेला नाहीं, अशी सर्वांची खात्री असल्यामुळें प्रत्येकजण आपल्या

ईश्वरदत्त आणि निसर्गसिद्ध अशा स्वतंत्रतेच्या हक्काला संभाळून ठेवण्यासाठीं फार दक्षतेनें वागत असतो व त्यामुळेंच स्वतंत्रतेवर त्याचें विशेष प्रेम जडतें आणि त्या स्वतंत्रतेवर ज़र दुसरा कोणी डोळा ठेवील तर त्याच्या नरडीचा घोट घ्यावा, अशा प्रकारची प्रत्येकाची चित्तवृत्ति स्वाभाविकपणेंच बनून गेलेली असते !

प्रत्येकाच्या मनाची अशी स्थिति असल्यामुळें दुसऱ्यांनीं आपली स्वतंत्रता कशी राखली, तिचें कोणत्या दुष्टांनीं हरण केलें होतें, आणि त्यांच्यापासून त्यांनीं आपली स्वतंत्रता परत कोणत्या उपायांनीं मिळवून घेतली, वगैरेबद्दलच्या हकीगती वाचण्याची व ऐकण्याची मनुष्यमात्राला अतिशय आवड लागलेली असते. अशा मनुष्यांच्या मनोरंजनासाठीं आणि सुशिक्षणासाठीं स्विझर्लंडच्या स्वतंत्रतेच्या इतिहासाचा पुष्कळ उपयोग होईल, असें जाणून आम्ही पुढील इतिहास देत आहोंत.

## डोंगरी मुलूख हीं स्वतंत्रतेचीं माहेरघरेंच

स्वित्झर्लंड हा युरोप खंडांतील एक लहानसा देश आहे. त्याचें क्षेत्रफळ जवळजवळ १६,००० चौरस मैल आहे आणि त्याची हल्लींची लोकसंख्या तीस लक्षांहून कांहीं जास्त आहे. क्षेत्रफळ आणि लोकसंख्या यांच्या मानानें पाहिलें असतां हा देश आपल्या इकडील जयपूर संस्थानाएवढा सरासरीनें आहे. दोन्ही ठिकाणच्या लोकांच्या शूरपणाकडे पाहिलें तर त्या बाबतींत बरेंच साम्य आढळतें. परंतु ही तुलना येथेंच थांबविली पाहिजे. कारण, त्या शूरपणाच्या उपयोगाकडे जर आपण ही तुलनेची दृष्टि वळविली, तर मात्र येथें भयंकर

विसंगति दृष्टोत्पत्तीस येईल. कारण, स्वित्झर्लंडमधील लोकांनीं आपल्या शूरपणाचा उपयोग आपली स्वतंत्रता मिळविण्याकडे आणि राखण्याकडे केला आहे व जयपूरमधील रजपूत लोक अंगांत पुष्कळ शूरपणा असूनहि लोकांच्या गुलामगिरींत कुजत पडलेले आहेत. या स्वतंत्रतेच्या बाबतींत स्वित्झर्लंडची कांहीं थोडीशी तुलना करतां आली तर ती आपल्या इकडील नेपाळच्या मुलखाशींच करतां येण्यासारखी आहे. शिवाय स्वित्झर्लंड आणि नेपाळ ह्यांच्यामध्यें दुसरें एक असें साम्य आहे कीं, हे दोन्हीही प्रदेश समुद्राच्या सपाटीपासून अतिशय उंचावर आणि अतिशय डोंगराळ जागेमध्यें वसलेले आहेत. डोंगरी मुलख हीं स्वतंत्रतेचीं माहेरघरेंच होत! आणि मोठमोठ्या पर्वतांचीं शिखरें हीं स्वतंत्रतादेवीचीं ईश्वरनिर्मित सिंहासनें होत. महाराष्ट्रांतील सह्याद्रीवर शिवाजीमहाराजांच्या वेळीं स्वतंत्रतेनें आपलें ठाणें कसें केलें होतें, हें महाराष्ट्र देशाचा इतिहास माहीत असणारांना सांगण्याचें कारण नाहीं. किंवा थोडे वर्षांपूर्वीं इंग्लिश लोकांचे शिपाई हिंदुस्थानच्या वायव्येकडील सरहद्दीवर एका हातांत तलवार व दुसऱ्या हातांत कोलीत घेऊन माणसें कापण्याकरितां आणि घरें जाळण्यांकरितां सर्वत्र सैरावैरा धांवत असतां, मलाकंद, चगदरा, स्वाट, जांडोल, इनायत किल्ला, नवागी वगैरे ठिकाणच्या पठाण लोकांनीं आपल्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याकरितां जी शिकस्त केली, त्यांत तेथील पर्वतांच्या उंच शिखरांनीं आणि खोल दऱ्यांनीं स्वतंत्रतेच्या संरक्षणाला किती हातभार लावला हेंही सर्वांना माहीतच आहे. स्वित्झर्लंडचीहि तशीच स्थिति आहे. अशा ठिकाणच्या लोकांना कित्येक नैसर्गिक फायदे असतात. तेथील स्वतंत्रतेचे किल्ले आणि

बुरूज खुद्द परमेश्वरानें आपल्या हातानें बांधलेले असतात; आणि त्या किल्लयांचे दगड व चुना हीं द्रव्यें खुद्द पंचमहाभूतांनीं आपल्या हातांनीं बनवून, कमावून आणि कसोटीला लावून दिलेलीं असतात. अशा ठिकाणीं राहणारे लोक सभोंवतालच्या परिस्थितीनें फक्त स्वतंत्रतेलाच योग्य असतात. ज्या ठिकाणीं रानटी पशूंची शिकार करून अन्न मिळवावयाचें आणि एखादा शुद्ध झरा पाहून पाणी प्यावयाचें, त्या ठिकाणीं कोण कोणाचा गुलाम होणार? तेथें सर्वच स्वतंत्र! जेथें मोठमोठ्या सुधारलेल्या कृत्रिम शहरांतून जीवनाची कृत्रिम पद्धत सुरू असते, आणि उपजीविकेच्या अनंत कृत्रिम साधनांची भ्रष्ट होत जाणाऱ्या मानवी प्राण्याला आवश्यकता भासूं लागते, त्या ठिकाणीं गुलामगिरीचा कृत्रिमपणा हळूहळू प्रादुर्भाव पावूं लागतो. परंतु डोंगरामध्यें कसली गुलामगिरी आली आहे! नेपोलियननें म्हटलें आहे कीं, Wherever there are mountains, there will be rebels. (जेथें जेथें डोंगर आहेत तेथें तेथें बंडखोर लोक उत्पन्न झालेच पाहिजेत.) नेपोलियन हा जुलमी राजा होता म्हणून त्यानें आपल्या भाषेंत स्वातंत्र्येच्छु लोकांना बंड-खोर म्हटलें आहे. परंतु सामान्य आणि खऱ्या भाषेंत हेंच वाक्य आपल्याला उच्चारावयाचें असलें तर आपण असें म्हणूं कीं, जेथें जेथें डोंगर आहेत तेथें तेथें स्वातंत्र्येच्छु लोक उत्पन्न झालेच पाहिजेत. ते जसे आपल्याकडे नेपाळांत, महाराष्ट्रांत आणि वायव्य सरहद्दीवरील हिमालयाच्या दऱ्यांतून उत्पन्न झाले, त्याचप्रमाणें ते स्वित्झर्लंडमधील आल्प्स पर्वताच्या पठारावर कसे निर्माण झाले, त्यांच्यामध्यें स्वातंत्र्याची प्रीति किती होती, त्यांनीं त्या स्वातंत्र्याकरितां काय काय

२६९६
उपाय योजिले आणि अखेरीस त्यांनीं तें स्वातंत्र्य कसें मिळवून घेतलें, याबद्दलच्या हृदयंगम आणि शिक्षणप्रद इतिहासाकडे आपण वळूं.

## तीन खेडीं एकत्र झालीं

स्वित्झर्लंडचे जे कित्येक पोटविभाग आहेत त्यांना कँटन अशी संज्ञा आहे. हे कँटन्स अगर विभाग अगर प्रांत नेपोलियनच्या वेळीं एकंदर एकोणीस करण्यांत आले. परंतु इ. स. १५१३ पर्यंत यांची मुख्य संख्या फक्त तेराच होती. इ. स. १५१३ मध्यें जरी ते तेरा प्रांत एकत्र झाले, तरी त्याच्यापूर्वीं हे सर्व एकमेकांपासून निरनिराळे होते. इ. स. १२९१ मध्यें प्रथमतः स्विझ, यूरी, आणि अंडरवाल्डेन हे तीन प्रांत एकत्र झाले आणि पुढें इतर प्रांतांना आपापल्या स्वतंत्रतेच्या संरक्षणाची जसजशी आवश्यकता उत्पन्न होऊं लागली, तसतसे ते प्रांत या पहिल्या तीन प्रांतांच्या कटामध्यें येऊन सामील होऊं लागले. स्वित्झर्लंड देशाच्या पोटविभागांना प्रांत हा शब्द सद्यःस्थितीच्या दृष्टीनें लावलेला आहे; परंतु पूर्वीं स्विझ हा विभाग अगदीं लहान होता. तें निवळ एका जंगलांतील एक खेडेगांव होतें. तेथील लोक गरीब, परंतु स्वतंत्र असत आणि डोंगरावरील कुरणांतून आपले मेंढराचे कळप चारून ते आपली उपजीविका आणि कालक्रमणा करीत असत. परंतु या कामांत त्यांना शेजारच्या राजांकडून कांहीं हरकत होऊं लागल्यामुळें त्यांना प्रतिबंध करण्याकरितां यूरी या नांवाच्या जवळच्या एका दरींतील लोकांपाशीं त्यांनीं एकी केली व अंडरवाल्डेन येथील लोकांवर जुलूम होऊं लागल्यामुळें तेहि या कटामध्यें येऊन सामील झाले. हीं त्या वेळीं तीन निवळ खेडीं

होतीं, परंतु त्यांना स्वतंत्रता पाहिजे होती, आणि शेजारच्या राजांचा जुलूम त्यांना नको होता म्हणून तीं आपल्या स्वतंत्रतेच्या संरक्षणा-साठीं एकत्र झालीं. त्यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, आपल्यावर हल्ला करण्याकरितां कोणी शत्रु आल्यास त्या वेळीं सर्वांनीं मिळून आपली स्वतंत्रता राखली पाहिजे व त्या कामीं आपला देह आणि द्रव्य हें सर्व खर्ची घालण्यासहि कोणीं मागेंपुढें पाहतां कामा नये. तसेंच, कोणी परकीय लोक आपला न्याय तोडूं लागले, तर आपला न्याय त्यांच्या हातांत कधींहि द्यावयाचा नाहीं; आपला न्याय तोड-ण्याला आपल्याच मुलखांतील न्यायाधीश असला पाहिजे; परकीय मनुष्याला आपल्या रीतिरिवाजांची माहिती नसल्यामुळें तो न्याय करण्याला सर्वथैव अयोग्य असतो, म्हणून आपल्यांतील वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध अशा लोकांकडूनच आपला न्याय करून घेतला पाहिजे, आणि त्यांचें जर कोणीं ऐकलें नाहीं तर सगळ्यांनीं मिळून त्यांचा हुकूम अमलांत आणला पाहिजे. अशा प्रकारचे कित्येक ठराव करून त्यांनीं आपल्या स्वतंत्रतेच्या एकीला बळकटी आणली होती.

## आल्बर्ट राजाचा सैतानी विचार

परंतु आपल्या स्वतंत्रतेमध्यें आनंदानें नांदत असलेल्या लोकांना आपण आपले गुलाम केलें नाहीं तर मग आपण राजे कसले, असें कित्येक राजांना वाटत असतें! जी सुंदर आणि पवित्र स्त्री पाहिली तिला व्याभिचारिणी करून आपल्या जनानखान्यामध्यें ओढलें तरच आपलें पुरुषत्व खरें, असें ज्याप्रमाणें कित्येक बदमाष आणि बदफैली बादशहांना पूर्वीं वाटत असे, त्याप्रमाणेंच प्रत्येक

स्वतंत्र लोकांना आपल्या गुलामगिरीच्या गोटांत आणून ठेवण्याचें बहुतेक बलाढ्य आणि जुलमी राजांना दुर्व्यसन लागलेलें असतें. स्वतंत्रता हें एक इहलोकचें नंदनवन आहे; त्या ठिकाणीं ॲडम आणि ईव्हप्रमाणें भाग्यवान् कुटुंबें सुखोपभोग घेत असलीं, तर तें जुलमी राजांना सहन होत नाहीं. ते सैतानाप्रमाणें निरनिराळीं सोंगें घेऊन त्या स्वतंत्रतेच्या प्रदेशामध्यें संचार करतात, व तेथील लोकांना आपल्या जाळ्यांत गुरफटून घेण्याकरितां ते नाना उपाय करतात. फार काय, प्रसंगविशेषीं सैतानाप्रमाणें साप होऊन सरपटतात आणि ज्याला चावावयाचें त्याच्यापुढील धूळ देखील चाटतात! अशाच प्रकारचा आल्बर्ट या नांवाचा एक राजा ऑस्ट्रियामध्यें त्या वेळीं राज्य करीत होता. त्याच्यानें या तीन कॅन्टन्समधील लोकांची एकी आणि स्वतंत्रता पाहवेना. त्यानें त्यांच्या सुखांत विष कालवण्याला सुरवात केली. आल्बर्ट आणि स्विस लोक यांचा राजा आणि प्रजा असा दूरचा आणि पुष्कळ दिवसांपूर्वींचा संबंध होता. परंतु हे स्वतंत्र लोक कोणालाच जुमानीत नसत. तेव्हां त्यांना वश करण्याकरतां आल्बर्टनें आपले दोन मुत्सद्दी पाठवले. जबरदस्तीपेक्षां सामोपचाराचा कांहीं जास्त उपयोग होईल असें म्हणून त्यानें प्रथम ही योजना करून पाहिली. आलेल्या मुत्सद्द्यांनीं असें सांगितलें कीं, आल्बर्ट हा फार चांगला राजा आहे, तो अतिशय ममताळू आहे, तो तुमच्यावर आपल्या मुलांप्रमाणें ममता करतो, तुमचें शौर्य आणि तुमचा स्वदेशाभिमान पाहून त्याला मोठें कौतुक वाटत आहे, आणि असले लोक आपल्या चाकरीला असले तर आपण त्यांचें शौर्य अधिक वाढवून दाखवूं अशी त्याची इच्छा आहे. आपल्या प्रजेला फसविणारे राजे अशाच

गोडगोड थापा मारीत असतात आणि एकीकडे त्यांच्या शौर्याची आणि स्वदेशाभिमानाची तारीफ करून दुसरीकडून त्यांच्या स्वतंत्रतेचा गळा कापीत असतात ! परंतु स्विस लोक हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणें कांहीं भोळसर नव्हते. त्यांनीं आल्बर्टच्या या युक्तीला दाद दिली नाहीं.

## अधिकाऱ्यांचे जुलूम वाढत चालले

स्विस लोक सामोपचारानें फसत नाहींत असें पाहिल्यानंतर आल्बर्टनें जबरदस्तीनें आपले दोन जुलमी अधिकारी त्यांच्यावर अमल करण्याकरतां पाठविले. त्यांचीं नांवें जेसलर आणि लँडेनबर्ग अशीं होतीं. जेसलर हा गव्हर्नर म्हणून नेमलेला होता आणि न्याय निवडण्याचें काम लँडेनबर्गकडे सोंपविलें होतें. परंतु हे दोघेहि अधिकारी अतिशय निर्दय, गर्विष्ठ, लोभी, मदोन्मत्त आणि अज्ञानी असे होते. असल्या प्रकारचे अधिकारी पाठविण्यांत आल्बर्टचा असा हेतु होता कीं, या अधिकाऱ्यांच्या जुलमानें त्रस्त होऊन स्विस लोकांनीं बंड केलें म्हणजे त्यांच्यावर हल्ला करून त्यांना पादाक्रांत करण्याला आपल्याला सहजच चांगली संधि मिळेल. यावरून दुष्ट अधिकारी नेमून लोकांना मुद्दाम सतावून सोडण्यांत जुलमी राजांचा काय मतलब असतो हें कोणाच्याही लक्षांत येईल ! या दोन अधिकाऱ्यांपैकीं लँडेनबर्ग यानें अंडरवाल्डेन येथील एका किल्ल्यामध्यें आपलें ठाणें बसविलें आणि जेसलर यानें यूरी प्रांतांतील सारनेन येथें आपल्याकरतां एक नवीनच किल्ला बांधला. पुढें हे दोघेही अधिकारी लोकांवर अतिशय जुलूम करूं लागले. लोकांच्या अपमानाला सीमा उरली नाहीं. कराचे पैसे वसूल करून घेण्याच्या कामांत अतिशय

कहर होऊं लागला. काहीं अपराध केला नसतांनाहि लोकांना तुरुंगांत जाण्याची पाळी येऊं लागली आणि यःकश्चित् अपराधाबद्दलसुद्धां त्या देशभक्त लोकांना आपल्या प्रिय देशांतून हद्दपार जाण्याच्या शिक्षा होऊं लागल्या. लोकांना घरें बांधावयाचीं झालीं तरी देखील राजाची परवानगी पाहिजे, इतकी स्थिति येऊन पोंहोंचली !

बर्नर या नांवाच्या एका मनुष्यानें एक घर बांधलेलें पाहून बादशहाच्या हुकमाशिवाय घर बांधण्याच्या या उद्दामपणाबद्दल याला चांगलें शासनच केलें पाहिजे, असें जेसलर बोलला. हे शब्द लोकांत पसरल्यामुळें ते अतिशय क्षुब्ध झाले. तरी पण या अधिकाऱ्यांचे जुलूम एकसारखे चाललेच होते. हेनरिक या नांवाचा एक मनुष्य एके दिवशीं आपलें शेत नांगरीत असतां न्यायाधीश लँडेनबर्ग याचा एक शिपाई तेथें आला आणि त्याच्या नांगराचे बैल न्यायाधीशाच्या कामाकरतां पाहिजे आहेत असें सांगून ते सोडून घेऊन चालला ! परंतु माझे बैल कां सोडून नेले जात आहेत, मीं काय अपराध केला आहे, आणि केला असल्यास त्याची केव्हां चौकशी झाली आहे, असें त्यानें विचारलें असतां, त्या जुलमी न्यायाधीशाच्या मदोन्मत्त शिपायानें असें उत्तर दिलें कीं, "तुम्ही बोलून चालून शेतकरी लोक, तुम्हांला तुमचे नांगर ओढण्याला बैल कशाला पाहिजेत ? तुम्हींच आपल्या माना या जोखडाखालीं घालून हे नांगर ओढलेत म्हणून काय झालें ?" हे अपमानास्पद शब्द उच्चारले गेले तेव्हां त्या हेनरिकचा मुलगा आर्नोल्ड हा जवळ होता. त्यानें हे शब्द सहन न होऊन त्या शिपायाच्या हातावर वार केला आणि त्याचीं बोटें तोडलीं व आपण पळून गेला. न्यायाधीशांनीं बापाला पकडलें

व मुलगा कोठें दडून बसला आहे तें त्यानें सांगावें म्हणून त्याचा पुष्कळ छळ केला व अखेरीस त्याची सर्व मिळकत ज़प्त करून त्या दुष्ट अधिकाऱ्यांनीं त्याचे डोळेही सोलून बाहेर काढले. या जुलमाची बातमी सगळीकडे पसरली. तेव्हां त्याबद्दल सूड उगवण्याची संधि केव्हां सांपडेल म्हणून सर्व लोक वाट बघत बसले.

स्विस लोकांच्या बायकांवरहि बलात्कार करण्याला त्यांच्या राज्यकर्त्यांनीं कमी केलें नव्हतें. लॅंडेनबर्गच्या हाताखालील एक अधिकारी एके दिवशीं कॉनरॅड या नांवाच्या एका इसमाच्या घरांत शिरून तो घरीं नसतां त्याच्या बायकोवर बलात्कार करूं लागला. त्या वेळीं कांहीं युक्तीनें त्याला घरांत आंघोळीच्या खोलींत बसवून ठेवून ती साध्वी मोठ्या कुशलतेनें घरांतून बाहेर पडली व तिनें आपल्या नवऱ्याला आंत धाडून दिलें. त्यानें कुऱ्हाडीनें त्या अधिकाऱ्याचे तुकडे तुकडे केले आणि तो जंगलांत नाहींसा झाला.

या जुलमाच्या गोष्टींनीं स्वित्झरलॅंडमधील सर्व लोक संतप्त झाले व सगळ्यांनीं एकदम बंड करून उठून असल्या ह्या जुलमी अधिकाऱ्यांचें आपल्या मानेवरील जोखड मोडून टाकावें असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले.

## गुप्त मंडळाची पहिली बैठक : स्वतंत्रतेसाठीं शपथा

अशा स्थितींत वर सांगितलेले बर्नर आणि आर्नोल्ड हे दोघे इसम व तिसरा एकजण असे तिघे एके दिवशीं एकत्र जमले व आपल्या देशाला या जुलमापासून स्वतंत्र तरी करूं किंवा या प्रयत्नांत मरून तरी जाऊं, असा त्यांनीं निश्चय केला. स्वित्झर्लंडमधील

स्वतंत्रतेकरतां सुरू झालेल्या गुप्त मंडळाची ही पहिली बैठक होय. या दिवशीं त्या तिघांनीं स्वदेशोद्धारासाठीं शपथा घेतल्या आणि फिरून एकत्र जमण्याचा त्यांनीं एक दिवस नेमला व त्या दिवशीं प्रत्येकानें आपल्याबरोबर नवीन दहा देशभक्त जमा करून आणावे असें ठरविलें. त्यांची जमण्याची जागा जंगलांतील एका सरोवराच्या कांठीं होती. तेथें नेमलेल्या दिवशीं एकंदर ते तीस देशभक्त जमा झाले व त्या सर्वांनीं आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं शपथा घेतल्या. या दोघा जुलमी अधिकाऱ्यांना घालवून सर्व देश बंधमुक्त करण्याचा त्यांनीं निश्चय केला. परंतु ते अधिकारी ज्या किल्ल्यांत राहत असत ते अतिशय मजबूत असल्यामुळें त्यांजवर उघड रीतीनें हल्ला करून जमावयाचें नाहीं, हें लक्षांत आणून लवकरच नवीन सुरू होणाऱ्या (इ. स. १३०८) वर्षाच्या पहिल्या दिवशीं गुप्त छापा घालण्याचा त्यांनीं बेत ठरविला. परंतु या तीस कटवाल्या लोकांनीं हा जो दिवस ठरविला होता, त्याच्या आधीं जेसलरच्या जुल्माची आणखी नवीन आणि अतिशय विलक्षण अशी एक गोष्ट घडून आली आणि तिच्यामुळें या जुलमी अधिकाऱ्यांचा उच्छेद करून आपण आपल्या देशाला गुलामगिरींतून मुक्त केलेंच पाहिजे, असा सर्व लोकांचा दृढनिश्चय होत चालला. आणि त्यामुळें या गुप्त कट करणाऱ्या लोकांना यशाची जास्त चिन्हें दिसूं लागलीं. इतकी आशा ज्या जुलमामुळें उत्पन्न झाली असा जेसलरनें विलक्षण जुल्म तरी काय केला? त्यामुळें लोक कसे बिथरले, आणि त्यांनीं आपली स्वतंत्रता कशी मिळविली, हा कथाभाग फारच सुरस आणि सुंदर आहे.

★

## :: २ ::

### फक्त ठिणगी पाहिजे होती

स्वित्झर्लंडमधील लोक ऑस्ट्रियाच्या जुलमाला अगदीं कंटाळून गेले होते, गुप्त मंडळ्या जमूं लागल्या होत्या आणि देशभक्तांनीं स्वदेश स्वतंत्र करण्याच्या शपथा घेतल्या होत्या. आपल्या मानेवरील गुलामगिरीचें जोखड आपण केव्हां झुगारून देऊं आणि आपल्या पायांतील गुलामगिरीच्या शृंखला आपण केव्हां तोडून टाकूं असें त्यांना होऊन गेलें होतें. दारूनें सुरुंग भरून तयार झालेला होता. फक्त एका ठिणगीचा अवकाश होता. ती मिळाल्याबरोबर स्वित्झर्लंड-वरील ऑस्ट्रियाच्या जुलमी सत्तेच्या ठिकऱ्या उडून जावयाच्या होत्या. इतकी जरी स्थिति झाली होती तरी स्वित्झर्लंडमधील जुलमी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांवरील धूर उतरला नव्हता.

जुलमी राजांना नेहमीं असेंच वाटत असतें कीं, आपली प्रजा आपण जितके जुलूम करूं तितके निमूटपणें सोशील. परंतु ज्याप्रमाणें सापाला दांत आणि विंचवाला नांगी असते त्याप्रमाणें मनुष्याला

त्वेष असतो, हें ते विसरतात. पारतंत्र्यांत मनुष्याच्या मनाला झोंबणारें विष असतें, आणि क्षुब्ध झालेल्या गुलामगिरीच्या तरवारींनीं अनेक जुल्मी राजांचे गळे कापलेले आहेत, या गोष्टी त्यांच्या स्वप्नांतहि येत नाहींत.

लोकांना आपली जन्मभूमि आपल्या आईप्रमाणें प्रिय असते, तिच्यासाठीं ते पाहिजे तें साहस करण्याला तयार होतात. आणि तिच्यावर जे जुल्म करतात त्यांना ते आपले कट्टे हाडवैरी समजून त्यांच्या विध्वंसासाठीं ते टपून बसलेले असतात. हा विचार त्यांच्या मनाला कधीं शिवतसुद्धां नाहीं. असल्या जुलमी अधिकाऱ्यांपैकींच जेसलर हा एक होता. लोक इतके खवळलेले आहेत तर आपण या वेळीं जास्त आचरटपणा करूं नये अशी सुबुद्धि त्याला त्या वेळीं सुचली नाहीं.

## म्हणे 'बादशाही टोपीला मुजरा करा!'

आणि ती कोठून सुचणार? ज्यांचें राज्य नष्ट करावयाचें देवाच्या मनांत येतें त्यांची बुद्धि देव पहिल्यानें नष्ट करतो. जेसलरनें एक बादशाही टोपी, एका काठीवर घालून ती काठी आपल्या राजधानींतील एका चवाठ्याच्या जागेवर उभी करून ठेवली व जो येईल त्यानें त्या टोपीला मुजरा केला पाहिजे आणि तसें जो करणार नाहीं तो राजद्रोही आणि बंडखोर समजला जाईल, म्हणून त्यानें ठरवलें.

असा हुकूम झाल्याबरोबर जे कित्येक तोंडपुजे लोक जेसलरपुढें लोटांगणें घालीत होते त्यांना आणखी एक नवीन देवता मिळाली! ते त्या टोपीपुढेंहि रोज लोटांगणें घालूं लागले! परंतु वुइल्यम टेल

हा अशांतील मनुष्य नव्हता. तो स्वतः त्या तीस कटवाल्यांपैकीं एक होता व आपले देशबांधव परकीय जुलमाचें जोखड आपल्या मानेवर कां वागवीत बसले आहेत, आणि तें एकदम झुगारून कां देत नाहींत, याबद्दल त्याला मोठा विस्मय वाटत असे.

राजाच्या टोपीला मुजरा केला पाहिजे ही गोष्ट जेव्हां त्याला कळली, तेव्हां मी असली अपमानास्पद गोष्ट कधींहि सहन करणार नाहीं असें त्यानें साफ सांगितलें. या राजद्रोहाची बातमी जेसलरला कळतांक्षणींच त्यानें वुइल्यम टेलला बोलावून आणलें व त्याचा छळ करण्याला त्यानें सुरवात केली. त्याला आणि त्याच्या मुलाला बोलावून त्यानें असें सांगितलें कीं, "तूं आपल्या तिरकमठ्यानें, आपल्या मुलाच्या डोक्यावर एक नारिंगाचें फळ ठेवून त्याजवर नेम मार; पण तो नेम चुकला तर मात्र तुझा शिरच्छेद करण्यांत येईल!"

वुइल्यम टेल हा आपल्या इकडील पृथ्वीराज चव्हाणासारखा नेम मारण्याच्या कामांत फार कुशल होता. परंतु थोडा नेम चुकला तर नारिंगाला लागणारा बाण मुलाच्या मस्तकाला लागून बापाच्या हातून पुत्रहत्या होण्याचा संभव होता. एखाद्या तिरंदाजानें बाण मारला तर तो एक चुकेल तरी किंवा बरोबर तरी लागेल. परंतु ह्या दोन्ही परिणामांना अनुलक्षून जेसलरनें आपली दुष्टपणाची तरतूद करून ठेवली होती. नेम बरोबर धरला तर तो बाण मुलाच्या मस्तकाला लागलाच पाहिजे आणि त्या बाणानें त्याचा प्राण गेला म्हणजे अर्थात् पुत्रशोकानें बाप व्याकुळ होऊन जाईल असें जेसलरचें धोरण होतें, आणि कदाचित् या पेंचांतून सुटण्याकरितां त्यानें नेम चुकविला, तर नेम चुकल्याबद्दल देहान्त प्रायश्चित्ताची योजना जेसलरनें

दुसरीकडे करून ठेवलेलीच होती. अशी जेसलरच्या जुलमाची दुहेरी युक्ति होती.

जुलमी अधिकारी किती दुष्ट असतात आणि ते अनाथ गरिबांचा मुद्दाम कसा छळ करीत असतात, हें ह्या जेसलरच्या निर्दयपणाच्यां आणि लबाडीच्या हुकुमावरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे. परंतु जे लोक जुलमाच्या विरुद्ध बंड करून उठले त्यांचा परमेश्वर नेहमीं पाठीराखा असतो, हें तत्त्व इतिहासांत अनेक जागीं आढळून येतें.

आपल्याला गुलामगिरी नको असा मनुष्यांच्या मनानें निदिध्यास घेतला म्हणजे परमेश्वर त्यांना स्वतंत्रता देण्याला तयारच असतो. ही परमेश्वराची लीला आणि गांजलेल्या लोकांना स्वतंत्रता देण्याच्या कामीं परमेश्वराची तत्परता या गोष्टी वुइल्यम टेलच्या आणि स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेच्या कथानकामध्यें फारच चांगल्या रीतीनें दिसून येतात.

## वुइल्यम टेलची स्फूर्तिदायक गोष्ट

हें कथानक येथपर्यंत इतिहासाला धरून वर्णिलें आहे. आतां कित्येक अर्वाचीन शोधकांनीं जरी असें शोधून काढिलें आहे कीं, ही वुइल्यम टेलची गोष्ट खरोखर घडून आलेली नसून ती काल्पनिक आहे, तरी सर्व इतिहासकारांनीं तिचा आपल्या इतिहासांतून उल्लेख केलेला आहे. 'व्हाइटबुक' आणि 'सुडी'चे ग्रंथ यांत याबद्दलची सविस्तर आणि विश्वसनीय अशी हकिकत दिलेली आहे, व अतिशय प्रख्यात जर्मन कवि शिलर, यानें या विषयावर एक अतिशय उत्तम

वीररसप्रधान नाटक लिहून वुइल्यम टेलची कीर्ति आणि स्वित्झर्लंडची स्वतंत्रता तिकडील लोकांमध्यें अजरामर करून ठेविली आहे. तसेंच इंग्रजी भाषेमध्यें शेरिडन नाउलेस यानेंहि एका नाटकाला हाच विषय घेतला आहे. या पुस्तकांतून त्या वेळच्या स्थितीचें, गांजलेल्या लोकांच्या विचारांचें, आणि स्वतंत्रतेबद्दलच्या उत्सुकतेचे ज़सें वर्णन आहे तसें तें दुसरीकडे कोठेंहि आढळणार नाहीं. म्हणून पुढील कथाभाग त्याच पुस्तकांच्या अनुषंगानें दिला आहे.

वुइल्यम टेलची गोष्ट खरी असो वा खोटी असो, त्याच्याशीं आपल्याला फारसें कर्तव्य नाहीं. खोट्या गोष्टींपासूनदेखील जर मनावर चांगला बोध होत असेल, तर त्यांचें अध्ययन करण्याला काय हरकत आहे ?

पंचतंत्रांतील किंवा इसापनीतींतील गोष्टी खऱ्या आहेत म्हणून लोक त्या वाचतात असें नाहीं. शिवाय ज्या गोष्टीनें युरोप खंडांतील सर्व लोकांना स्वातंत्र्याची किंमत शिकविली आहे आणि जिचें कथन अद्यापहि तिकडील लोकांच्या बाहूंमध्यें स्फुरण उत्पन्न करीत आहे, अशी ही गोष्ट हिंदुस्थानांतील आमच्याहि देशबांधवांना जरूर माहीत असली पाहिजे.

## सुंदर सरोवरांच्या प्रदेशांत

वुइल्यम टेलचा मुख्य धंदा म्हटला म्हणजे शिकारीचा होता; व त्यासाठीं त्याला नेहमीं भयंकर अरण्यांतील उंच शिखरांवरून, खोल दऱ्यांतून आणि तुटलेल्या कड्यांवरून फिरावें लागत असे. या

विश्राम... क्रमांक ३३ २९।२१ नों. दि

प्रसंगीं आल्प्स पर्वताच्या दिव्य शोभा सहजगत्या त्याच्या अंत:करणामध्यें प्रविष्ट झाल्यामुळें त्याचें मन उदात्त झालेलें होतें. तो जेथें राहत असे व ज्या प्रदेशांत शिकारीकरितां तो हिंडत असे, तेथील सृष्टिरचना व वनश्री फार विलक्षण होती. आल्प्स पर्वताची अतिशय वरचीं शिखरें नेहमीं बर्फानें आच्छादिलेलीं असत आणि त्याच्या खोल खोल दऱ्या धुक्यानें व्यापून गेलेल्या असत. परंतु मधून मधून जे पठार होते, त्या ठिकाणीं वरून वाहत येणाऱ्या पाण्याच्या योगानें जीं सुंदर सरोवरें बनलेलीं होतीं त्यांच्या आसपास बरीच वस्ती होती.

तेथील कुरणांतून आपल्या गाईंना चरत सोडून त्यांचे गुराखी त्या तळ्यांच्या कांठीं आपलीं सुस्वर आणि मंजुळ अलगुजें वाजवीत विश्रांति घेत गवतावर पडत असत. त्या गाईंच्या गळ्यांतील घंटांचे आवाज दुरून हळूहळू ऐकूं येत असल्यामुळें ते अगदीं निर्धास्त असत. तीं गुरें त्या तळ्यांवर पाणी प्यावयाला आलीं म्हणजेहि त्यांची फार शोभा दिसत असे. शेजारच्या डोंगरांतून गवळणी दुधाचीं भांडीं आपल्या डोक्यावर घेऊन खालीं उतरत असत आणि तुटलेल्या कड्यांवर दोरखंडाच्या शिड्या लावून शेतकरी लोक मोठमोठीं ओझीं घेऊन वर चढत असत. एका कड्यावरून दुसऱ्या कड्यावर जाण्याला कोठें कोठें लाकडी पूल केलेले असत. त्यांवरून जातांना माणसांचे डोळेच फिरून जावयाचे. तरी पण ते शेतकरी तेथूनहि निर्धास्तपणें जात असत. असल्या जागेंत फिरून अतिशय उंच अशा आल्प्स पर्वतापेक्षांही उंच आकाशांमध्यें घिरट्या घालणाऱ्या पक्ष्यांची शिकार करणाऱ्या लोकांच्या अंगामध्यें धाडस आणि स्वतंत्रतेची प्रीति हे गुण अवश्य उत्पन्न झालेच पाहिजेत.

## ' स्वातंत्र्य हीच आपली संपत्ति '

अशा परिस्थितींत वाढलेल्या वुइल्यम टेलच्या मनामध्यें स्वदेश-भक्ति आणि स्वातंत्र्यप्रीति हीं अतिरेकाला जाऊन पोहोंचलेलीं असलीं तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं. वुइल्यम टेलला आपला देश गुलामगिरींत सांपडलेला पाहून अतिशय वाईट वाटत असे. एकदां डोंगरांत शिकारीसाठीं फिरत असतां एक पक्षी आकाशांत उंच फिरतांना त्यानें पाहिला व त्याला बाण मारून खालीं पाडावें, असें त्याच्या मनांत आलें.

परंतु इतक्यांत त्याला आपल्या गेलेल्या स्वातंत्र्याची आठवण होऊन त्यानें धनुष्याला लावलेला बाण काढून परत भात्यांत ठेवला. तो म्हणाला : " हा पक्षी स्वतंत्रतेनें आकाशांत फिरत आहे. त्याची स्वतंत्रता मी कशाला नष्ट करूं ? आम्हांला स्वतंत्रता असती तर आम्हीं ह्याच्यासारखाच स्वैर रीतीनें संचार केला असता. पण आमच्या कपाळीं तें सुख नाहीं. तें सुख हा पक्षी भोगीत आहे. तें मी त्याच्यापासून कधींही नष्ट करणार नाहीं ! " दुसऱ्याचें स्वातंत्र्य पाहून तो अशा रीतीनें हळहळत असे. डोंगरांतील गरीब लोकांपाशीं संपत्ति वगैरे कांहीं एक नसतें, असें असतां जुलमी राजे त्यांना विनाकारण कां छळतात, असा एकदां प्रश्न निघाला असतां त्याच्यावर वुइल्यम टेल असें म्हणाला कीं, " आपल्यापाशीं संपत्ति नाहीं असें कोण म्हणेल ! स्वतंत्रता ही आपली संपत्ति आहे. या स्वतंत्रतेच्या रत्नासारखें रत्न कोणत्याहि खाणीमध्यें आजपर्यंत सांपडलें नाहीं आणि याच्यासारखें पाणीदार मोतीं कोणत्याहि समुद्रांत यापुढें

तयार होणार नाहीं. जुलमी राजे याच संपत्तीला लुटून नेण्यासाठीं धडपडत असतात. हा गरीब लोकांचा खजिना हस्तगत करण्याकरितां जुलमी राजे आपले खजिने खर्च करतात, रात्रीची झोंप नाहींशी करून घेतात, हजारों लोकांच्या खुनांच्या पातकांचें ओझें आपल्या डोक्यावर वाहण्याला तयार होतात आणि नरकलोकाची वाट जवळ करतात. परंतु इतकें करूनहि त्यांना स्वतःला अखेरीस सुख होत नाहीं तें नाहींच. असल्या राजांची जुलमी राजे म्हणून अपकीर्ति होते आणि स्वतंत्र लोक मात्र आपल्या स्वतंत्रतेला मुकतात!"

## 'कसाहि असला तरी हा माझा देश आहे!'

वुइल्यम टेल हा रानांत फिरत असतां पुष्कळ वेळां वादळामध्यें सांपडत असे; हा प्रसंग फार कठीण असतो. बर्फावरून चालत असतां एखादे वेळीं त्याचें कवच पातळ असलें तर तें फुटून त्याच्या-खालील पाण्यांत बुडून जाण्याचा संभव असतो. किंवा पर्वताच्या शिखरावरून बर्फाचे डोंगर खालीं कोसळत असतात, त्यांत कोणी सांपडला तर त्यांतूनहि जिवंत निघण्याची आशा नसते. तसेंच वारा अतिशय ज़ोरानें सुटलेला असल्यामुळें मनुष्यसुद्धां उडून जाण्याची भीति असते. अशा एका भयंकर वादळांत वुइल्यम टेल एकदां सांपडला असतां त्याच्या मनांत असा विचार आला कीं, अशा वादळाच्या देशांत राहण्यापेक्षां आपण दुसऱ्या एखाद्या देशांत राहावयास गेलों तर काय वाईट? परंतु हा विचार फार वेळ टिकला नाहीं. तो म्हणाला: "स्वित्झर्लंड हा माझा देश आहे! तो कसाही असला तरी तो मला प्रिय आहे. माझे पूर्वज जेथें मेले व मी जेथें जन्मास आलों, तो देश

मी कधींहि सोडणार नाहीं. हल्लीं जरी याला गुलामगिरी प्राप्त झाली आहे तरी, याची स्वतंत्रता आम्ही परत मिळवूं. हा डोंगरी देश म्हणजे स्वतंत्रतेचा देश आहे. हा माझा देश आहे. वाऱ्यांनो, तुम्ही वाटेल तितक्या जोरानें वाहा. हा देश मी कधींहि सोडणार नाही!"

## वादळांतील जीवन चालेल पण गुलामगिरी नको!

स्वतंत्रतेचा प्रख्यात कवि जो शिलर त्यानें वुइल्यम टेल आणि त्याचा मुलगा यांचा ह्याच स्वदेशप्रीतीबद्दल एक तुलनात्मक संवाद दिला आहे, तो फार मनोवेधक आहे.

मुलगा :—बाबा, या अडचणीच्या डोंगराळ जागेंत राहण्यापेक्षां खालच्या मैदानांत आपण कां राहत नाहीं?

बाप :—ते देश फार चांगले आहेत खरे, पण तेथें एक वाईट आहे. तेथील शेतें जे लोक नांगरतात त्यांना त्या शेतांतील धान्य खावयास मिळत नाहीं.

मुलगा :—कां? ते स्वतंत्र नाहींत?

बाप :—नाहींत. तेथील सगळी ज़मीन राजांनीं आपल्या ताब्यांत घेतली आहे.

मुलगा :—पण निदान जंगलांत शिकार करण्याला तर कोणाची भीति नाहीं?

बाप :—छे! छे! जंगलांत देखील राजांची बंदी असते.

मुलगा :—बरें, नद्या आणि समुद्र यांतील मासे मारून खाण्याला तर कोणी बंदी करीत नाहीं?

बाप :—हं ! राजांनीं मासे मारण्यालाहि बंदी ठेवली आहे आणि समुद्राच्या खाऱ्या पाण्यालासुद्धां मिठासाठीं अटकाव आहे.

मुलगा :—असे हे लोकांना जेथें तेथें बंदी करणारे राजे म्हणजे असतात तरी कोण ?

बाप :—लोकांच्या संरक्षणासाठीं म्हणून आपआपल्यापाशीं मोठमोठीं सैन्यें ठेविलेलीं असतात; आणि त्या सैन्याच्या जोरावर ते लोकांना जेथें तेथें अशी बंदी करीत असतात.

मुलगा :—मग लोक आपणच आपलें संरक्षण कां करून घेत नाहींत ?

बाप :—त्यांचा एकमेकांवर विश्वास नसतो म्हणून !

मुलगा :—बाबा, तर मग असल्या ठिकाणीं राहण्यापेक्षां आपल्या या डोंगरांत राहणेंच फार चांगलें. असल्या राजांसारख्या नीच मनुष्यांपासून आपलें संरक्षण करून घेण्यापेक्षां ह्या डोंगरावरील वादळांनीं एखाद्या दिवशीं आपल्याला मारलें तरीहि तें कांहीं वाईट नाहीं. कारण, यांत स्वतंत्रता आहे !

याप्रमाणें वुइल्यम टेल आणि त्याचा मुलगा यांचीं स्वतंत्रतेविषयींचीं भाषणें चालत असत. तो आपल्या मुलाच्या लहान लहान चिमुकल्या हातांकडे पाहून आपल्या मनांत असें म्हणत असे कीं, " हे हात लहान आहेत, पण कांहीं दिवसांनीं हे मोठे झाले म्हणजे आपल्या देशावर जुलूम करणाऱ्या राजांना हे हात त्यांच्या सिंहा-

सनांवरून खालीं ओढतील आणि आपल्या देशबांधवांच्या पायांमध्यें ज्या गुलामगिरीच्या शृंखला आहेत त्या तोडून टाकण्याचें सामर्थ्य कांहीं दिवसांनीं परमेश्वर या हातांमध्यें उत्पन्न करील!" आणि आपला मुलगा स्वदेशाच्या स्वतंत्रतेच्या उपयोगी पडावा अशाच रीतीनें तो त्याला शिक्षणहि देत असे.

पहांटेस उठून शिकारीला जाणें, डोंगरांत फिरणें, आपले धनुष्य-बाण तयार करणें, अचूक नेम मारणें वगैरे गोष्टी तो आपल्या मुलाकडून मुद्दाम करवून घेत असे; नेम मारण्याचें शिक्षण देत असतां एकीकडे तो आपल्या मुलाच्या मनामध्यें तेथील जुलमी अधिकारी जो जेसलर त्याच्याबद्दल मोठ्या युक्तीनें द्वेष उत्पन्न करीत असे. ज्या एखाद्या पदार्थावर नेम धरावयाचा असेल त्याला तो जेसलर असें नांव देई व आपल्या मुलाला सांगे कीं, "हा प्रत्यक्ष जेसलर तुझ्यापुढें उभा आहे अशी कल्पना कर आणि आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं बरोबर याच्यावर नेम मार पाहूं! एका क्षणांत या जुलमी जेसलरची छाती फुटून गेली पाहिजे!" असल्या वाक्यांनीं वुइल्यम टेल आपल्या मुलाचा जुलमाविषयींचा क्षोभ उत्तेजित करीत असे.

## सगळे लोक जेसलरला कंटाळले!

परंतु हा जेसलरचा जुलूम फक्त वुइल्यम टेललाच असह्य झाला होता असें नाहीं. सर्व लोक त्याच्या जुलमानें सारखेच त्रस्त होऊन गेलेले होते. जेसलरच्या जुलमापुढें पर्वताचा कडा कोसळणें, बर्फाचा लोट खालीं येणें, वगैरे गोष्टींचें सुद्धां लोकांना कांहीं वाटत नसे.

अरण्यांत एखादा हिंस्र पशु त्यांच्या अंगावर धांवून आला, तर हा जेसलर नाहीं, हा हिंस्र पशु आहे, हा कदाचित् दया करील, अशा हेतूनें लोकांना समाधान वाटत असे !

इतर ठिकाणच्याप्रमाणें त्या ठिकाणच्याहि शेतांत पीक येत असे. झाडांना फळें येत, आणि वेली पुष्पांनीं सुशोभित होत. परंतु लोकांना त्यापासून तिळमात्रहि आनंद होत नसे. कारण, हें सगळें परकीय अधिकारी लुटून नेणार हें त्यांना पक्कें माहीत होतें !

गुरांचे आणि बकऱ्यांचे कळप डोंगरांतील चरण्यानें चांगले पुष्ट होत, परंतु हे परकीय अधिकाऱ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडणार ही कल्पना त्यांच्या मनांत उभी राहिली म्हणजे त्यांना अतिशय दु:ख होत असे. लहान लहान सुंदर मुलें असलीं तरी त्यांना आलिंगन द्यावें असें आईबापांच्या मनांत येत नसे. हीं गुलामगिरीच्या दोषानें दूषित झालीं आहेत असें पाहून त्यांच्या डोळ्यांतून टिपें गळत. लोकांना क्षुल्लक कारणांसाठीं अतिशय जुलूम सोसावा लागत असे. जेथें कोणाला जाताहि यावयाचें नाहीं अशा कठीण कड्यांतील जमिनीवरसुद्धां जुलमी कर बसविलेले होते.

अशा एका ठिकाणचें गवत एका शेतकऱ्यानें कापण्याचा गुन्हा केला. ही जागा एका कड्यांच्या अगदीं टोंकावर होती. गुरेंसुद्धां जाऊन तेथील गवत खाण्याला धजत नसत. तें गवत आपल्या पोटाची खांच भरण्याकरतां कापल्याबद्दल त्या शेतकऱ्याला किती तरी दिवस तुरुंगांत अडकून पडावें लागलें होतें. अखेरीस उपाशी मरत चाललेलीं आपलीं मुलें घेऊन त्याची बायको एक दिवस जेसलरची वाट अडवून

उभी राहिली. तिनें आपलीं मुलें त्याच्या वाटेंत आडवीं टाकलीं आणि त्यांनाहि तुडवून जाण्याला तो निर्दय तयार झाला, तेव्हां तिनें त्याच्या घोड्याचा लगाम धरला. तरी त्याला दया आली नाहीं. जेसलरनें आपल्याकरितां किल्ला बांधण्याचें काम सुरू केलें होतें, तेथेंहि लोकांवर रोज असेच जुलूम चालले होते !

शिलरनें या प्रसंगाचें जें वर्णन केलें आहे, त्यावरून जुलमी राजांच्या सुंदर इमारती बांधल्या जात असतांना गरीब लोकांचीं हाडें किती खिळखिळीं होतात याची चांगली कल्पना येते. तो किल्ला बांधीत असतांना हा आपणच आपल्याकरितां तुरुंग बांधीत आहों, असें त्या लोकांना समजत होतें. तरी पण निरुपायास्तव आपल्या स्वतंत्रतेचें तें थडगें उभारण्याला हजारों लोक जेसलरच्या हुकुमानें रात्रंदिवस खपत होते. त्यांत कित्येक दमून बसले असतां मुकादमाच्या हातच्या छड्यांचा मार खात होते व कित्येक परांची वरून खालीं पडून प्राणालाहि मुकत होते !

इतके जुलूम झाल्यानंतर कोणाला संताप येणार नाहीं ? सर्वांनीं असल्या अधिकाऱ्याला घालवून लावून आपली स्वतंत्रता परत मिळविण्याचा निश्चय केला. वृद्ध लोक मरण्याच्या वेळीं अंथरुणावरून आपल्या मुलांना असा उपदेश करूं लागले कीं, तुम्ही सर्व एक व्हा आणि आपला देश स्वतंत्र करा ! आपला देश स्वतंत्र झाल्याशिवाय मेलेल्या लोकांना मूठमातीसुद्धां द्यावयाची नाहीं असा तरुणांनीं निग्रह केला. तसेंच जे तरुण लोक आपल्या देशाच्या स्वतंत्रतेच्या कामीं साहाय्य करतील त्यांनाच फक्त आपण वरावयाचें, असा तरुण कुमारिकांच्या प्रेमवृत्तीचा ओघ वळला.

## स्त्रिया सुद्धां सांगूं लागल्या : 'गुप्त कट करा'

स्त्रियांनाहि स्वतंत्रतेच्या स्फूर्तीनें धैर्य आलें आणि त्या आपल्या नवऱ्यांना गुप्त कट आणि लढाई यांबद्दल सल्ला देऊं लागल्या. शिलरनें अशा एका प्रसंगाचें फार उत्तम वर्णन केलें आहे. स्टाफॉचर या नांवाच्या एका इसमाला त्याच्या बायकोनें गुप्त कट करून परशत्रूचें निवारण करण्याविषयींची युक्ति सुचविली. त्या वेळचें त्या उभयतांचें भाषण फार मनोरंजक आहे :—

बायको :—शत्रूची एवढी भीति कशाला पाहिजे? ते पुरुष आहेत तसे तुम्हीहि पुरुष आहां आणि त्यांच्याप्रमाणें तुम्हांलाहि आपलीं शस्त्रें उगारतां येतात! प्रयत्न तर करून पाहा! जिकडे न्याय आहे, त्या पक्षाला परमेश्वर यश देतो.

नवरा :—लढाईपासून किती नुकसान होतें याची तुला कल्पना नाहीं, म्हणून तूं मला हा मार्ग सुचवीत आहेस.

बायको :—नुकसान किंवा नफा यांपैकीं परमेश्वराच्या मनांतून जें कांहीं करावयाचें असेल तें सोसण्याला मनुष्यानें तयार असलें पाहिजे. पण लोकांचे अन्याय विनाकारण सहन करीत बसण्याची आपल्या मनाला संवय लागलेली चांगली नाहीं.

नवरा :—पण हें जें आपलें घर तुला इतकें आनंद देत आहे, तें कदाचित् लढाई सुरू झाली तर जळून खाक होईल.

बायको :—माझी जरी असल्या ह्या ऐहिक क्षणभंगुर वस्तूंवर प्रीति असली, तरी आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं जरूर असेल तर मी आपल्या हातानें या घराला पहिल्यानें आग लावून देईन !

नवरा :—या निर्जीव वस्तूंचा त्याग करण्याला तूं कदाचित् तयार होशील, पण पाळण्यांत जीं लहान मुलें खेळत आणि बागडत असतात, तींसुद्धां त्या निष्ठुर लढाईला बळी पडतात.

बायको :—तुम्ही हें नेहमीं लक्षांत ठेवा कीं, जे अनाथ आणि निरुपद्रवी प्राणी आहेत त्यांचें परमेश्वर संरक्षण करीत असतो. पण तुम्हांला मागची मुलाबाळांची काळजी नको. तुम्ही पुढें पाऊल टाकून शत्रूवर चला म्हणजे झालें.

नवरा :—आमचें काय ? आमचें ठीकच आहे. आम्ही समरांगणांत जाऊं आणि शत्रूशीं लढून मरूं. परंतु आमच्या मागें तुमच्यासारख्या स्त्रियांची काय वाट ?

बायको :—आमच्यासारख्या अबलांनाहि देवानें संरक्षणाचा मार्ग मोकळा ठेवला आहे. एखाद्या कड्यावर जाऊन तेथून खालीं उडी टाकली म्हणजे झालें !

हें आपल्या बायकोचें भाषण ऐकून स्टाफॉचर याला अतिशय आनंद झाला व तिला आलिंगन देऊन तो म्हणाला, "ज्या लोकांना अशा शूर, स्वदेशाभिमानी आणि स्वातंत्र्यलोलुप स्त्रिया मिळाल्या आहेत, ते आपल्या देशाकरतां मोठ्या आनंदानें लढण्याला तयार

होतील आणि त्यांच्याविरुद्ध कितीहि मोठें सैन्य आलें तरी ते त्याचा तेव्हांच फडशा पाडून टाकतील." अशा रीतीनें लोकांची चित्तवृत्ति बदलत चालली होती.

## आतां कळस झाला; 'सूड उगवलाच पाहिजे'

जेसलरच्या जुलमाखालीं कोणालाहि घरादाराची शाश्वती उरली नव्हती. सत्याचें तोंड बंद झालें होतें, शहाणपणाचे डोळे फुटून गेले होते, आणि पराक्रमाच्या हातापायांमध्यें शृंखला अडकविण्यांत आल्या होत्या. अशा स्थितींत लोकांना जिवंत राहणेंहि अशक्य झालें होतें. आणि स्वित्झर्लंडमध्यें लांडगे, वाघ आणि जुलमी अधिकारी यांनींच फक्त राहावें अशी अवस्था येऊन पोहोंचली होती. तरी पण जेसलरचा जुलूम मर्यादेपलीकडे जाईपर्यंत आपण वाट पाहावी असें कित्येकांचें म्हणणें होतेंच ! परंतु याविरुद्ध जे कित्येक लोक होते त्यांचें असें म्हणणें पडलें कीं, "आणखी वाट किती पाहावयाची? आतां मर्यादेचें उल्लंघन काय व्हावयाचें उरलें आहे? कोणता जुलूम आपल्यावर आतांपर्यंत झालेला नाहीं? माणसांच्या डोळ्यांतील बुबुळें देखील सुरक्षित नाहींत ! (जेसलरनें खरोखरच एकाचे डोळे बाहेर काढले होते.) आपण आणखी किती जुलूम सहन करणार? गरीब बिचारें हरिण देखील फार पाठलाग केला म्हणजे उलटून शिंगें उगारून अंगावर धांवतें, बैल नेहमीं मनुष्याच्या जोखडाखालीं आपली मान नम्रपणानें घालून देतो, पण तोसुद्धां एखाद्या वेळीं रागावला म्हणजे बेधडक आपल्या धन्याच्या अंगावर चवताळून जातो, मग आपण तर मनुष्य आहों. आपलें संरक्षण आपल्याला करतां यावयाचें नाहीं? मग आपण

ही तीर मारण्याची विद्या कशाला शिकलों ? आणि हें कुऱ्हाडीचें ओझें आपण आपल्या खांद्यांवर कशाला वाहत आहों ?

अशा प्रकारचे विचार लोकांत फैलावत जाऊन अखेरीस कटवाल्या मंडळींची गुप्त सभा अरण्यांत एके ठिकाणीं भरली.

जे देशांतील खरे रहिवासी—त्यांना चोरांप्रमाणें लपून छपून देशहिताच्या विचारासाठीं जाण्याची पाळी आली. थंडीचें निवारण करण्याकरितां त्यांच्या अंगावर वस्त्रें नसल्याकारणानें त्यांनीं मध्यभागीं लांकडें पेटवून विस्तव केला. कोणी कड्यावरून दोरीला धरीत धरीत खालीं उतरले, कोणी दरींतून हळूहळू वर आले, आणि कोणी सरोवरांच्या पलीकडून होडींत बसून आले.

सर्वजण जमल्यानंतर काय करावें याच्याबद्दल बराच वेळ विचार झाला. हा विचार चालतां चालतां अखेरीस सूर्योदय झाला. तेव्हां त्या उगवणाऱ्या सूर्याला साक्षी ठेवून सर्वांनीं आपले हात वर उभारून अशी शपथ वाहिली कीं, आपण स्वदेशाच्या स्वतंत्रतेसाठीं नेहमीं सरळ्या भावांप्रमाणें वागूं आणि गुलामगिरींत जिवंत राहण्यापेक्षां मरण जास्त चांगलें असल्यामुळें परमेश्वरावर विश्वास ठेवून आपल्या पूर्वजांप्रमाणें स्वतंत्र होऊं. अशी शपथ वाहून त्यांनीं एकमेकांना आलिंगन दिलें व जेसलरवर सूड उगविण्याच्या उद्योगाला सर्वजण लागले.

## वुइल्यमनें राजाची हॅट तुडविली

इकडे पूर्वीच्या जुल्मांनीं तृप्त न होऊन जेसलरनें एका काठीवर एक टोपी घालून ती चव्हाट्यावर उभी करून ठेवली व तिच्यापुढें गुडघे टेकन मजरा केला पाहिजे अशी दवंडी पिटविली.

परंतु त्या टोपीबद्दल आदर दाखविण्याच्याऐवजीं लोक त्या वेडगळ कृत्याची थट्टाच करूं लागले, ती अतिशय चव्हाट्याची जागा होती, तरी पण ही दवंडी पिटविल्यापासून तेथें एकसुद्धां मनुष्य येईनासा झाला, इतकी लोकांच्या मनांत जेसलरबद्दल राजनिष्ठा वास करीत होती! या चव्हाट्यावरून जवळची वाट असली तरी लोक मुद्दाम दोन दोन कोसांचा हिसका घेत, पण त्या टोपीजवळ जाण्याचें टाळीत. आणि गांवांतील चटोर पोरें तर तेथें येऊन आपल्या डोकीवरच्या टोप्या उंच फेकून तेथील रखवालदार शिपायांना त्रास देऊं लागलीं व बादशहाच्या टोपीवर खडे मारून ती पाडण्यापर्यंतही मजल आली.

रखवालदार शिपायांना त्या रिकाम्या टोपीजवळ रखवाली करीत बसण्याची लाज वाटूं लागली. आणि आपल्या अधिकाऱ्यांच्या या मूर्खपणाबद्दल त्यांनाहि हसूं येऊं लागलें. पुढें कोणी जवळून गेला आणि त्यानें मुजरा केला नाहीं, तरी त्याच्याकडे आपण पाहिलेंच नाहीं, असा ते कानाडोळा करूं लागले. कोणी दूर उभें राहून त्या टोपीकडे बोट दाखवीत व दुसऱ्यांना म्हणत कीं, "तो पाहा तेथें आपला जुलमी अधिकारी टांगला आहे!" अशी बहुतेकांनीं त्या टोपीची टर मांडली होती. तरी त्या टोपीपुढें राजनिष्ठपणानें मुजरा करणारेहि कित्येक मूर्ख लोक निघाले. त्यांना पाहून वुइल्यम टेलच्या अंगाचा अतिशय संताप झाला. तो म्हणाला, "असल्या माणसांपेक्षां पशूदेखील फार बरे. कारण, त्यांना जितक्या नीच योनींत घातलें आहे, त्याच्यापेक्षां जास्त नीचपणाला ते जात नाहींत. कुत्रा हा नेहमीं कुत्राच राहतो आणि सरपटणारा एखादा

दिवडसुद्धां आपल्यापेक्षां कमी दर्जाच्या जातीचें लांच्छनास्पद कृत्य करीत नाहीं. परंतु मनुष्यप्राणी हा आपल्याला त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ म्हणवीत असून नीचपणांत त्यांच्यापेक्षांही खालीं उतरतो." असे उद्गार काढून बुइल्यम टेल त्या टोपीजवळ गेला. तो आवेशाने येत असलेला पाहून तेथील सर्व सरकारी अधिकारी पळून गेले.

त्यानंतर बुइल्यम टेल तेथें जमलेल्या आपल्या देशबंधूंकडे वळून त्यांना म्हणाला : "माझ्या देशबंधूंनो, पाहा, तुम्ही कशाला भीत होतां? यांना? या पळपुट्यांना? या माणसांच्या बाह्य आकृतींना? आणि या शिपायांच्या सोंगांना? तुम्ही असे आश्चर्यचकित होऊन काय बसलां आहां? तुम्हांला याचेंच एवढें आश्चर्य काय वाटत आहे? हे ज्या गोष्टी करीत आहेत त्या तुम्हीं मनांत आणलें तर तुम्हांलाहि करतां येतील. तुम्ही मनुष्यच आहां! तुम्हांलाहि विचार करण्याला डोकें आहे आणि कृत्यें करण्याला हात आहेत. तुम्ही रानांतल्या एखाद्या पशूची किंवा पक्ष्याची शिकार करावयाला गेलां तर परमेश्वरानें दिलेली स्वतंत्रता राखण्याकरितां तो देखील प्रयत्न करतो; आणि तुम्हांला त्या पक्ष्यापेक्षां आपल्या स्वतंत्रतेचें जास्त ज्ञान असून तुम्ही या गुलामगिरीमध्यें संतोष मानून राहतां? तुम्ही असे बावळ्यासारखे बघत काय उभे राहतां? या टोपीची तुम्हांला भीति वाटते? हिच्यांत काय आहे? ही पाहा मी काठी खालीं पाडून ही जेसलरची टोपी आपल्या पायाखालीं तुडवितों!" असें म्हणून त्यानें त्याप्रमाणें केलें.

## वुइल्यमचा अचूक नेम

इतक्यांत पळून गेलेले अधिकारी जास्त मदत घेऊन तेथें आले व त्यांनीं वुइल्यम टेलला व त्याच्या मुलाला कैद केलें. इतक्यांत जेसलरहि तेथें आला आणि त्यानें वुइल्यम टेलनें आपल्या मुलाच्या डोक्यावरील नारिंगाला नेम मारावा अशी कपटाची तोड काढली.

वुइल्यम टेलनें पुष्कळ आढेवेढे घेतले, परंतु कांहीं उपाय चालेना. वुइल्यम टेल जरी नको म्हणत होता तरी आपल्या बापाचा नेम किती अचूक असतो याची खात्री असल्यामुळें त्याचा मुलगा बापाला आग्रहच करीत होता. शंभर पावलांवरून नेम मारण्याचा हुकूम झाला होता. त्याप्रमाणें मुलगा शंभर पावलांवर जाऊन बसला. आणि एक फळ त्याच्या डोक्यावर ठेवण्यांत आलें. इकडे वुइल्यम टेलहि दोन बाण घेऊन, त्यांपैकीं एक आपल्या वस्त्राखालीं झांकून ठेवून, आपल्या मुलाच्या मस्तकावरील फळाला नेम मारण्याकरतां आपली दृष्टि कायम करूं लागला. यांची अशी तयारी चालली असतां सभोंवतालीं जमलेले लोक अतिशय क्षुब्ध होऊन गेले. बापाच्या बाणानें मुलाचें मस्तक फुटणार असें पाहून कित्येक बायका बेशुद्ध पडल्या आणि कांहीं पुरुष भीतीनें ओरडूं लागले. तरीहि जेसलरच्या हृदयाला द्रव आला नाहीं. पण ईश्वराच्या कृपेनें वुइल्यम टेलचा बाण इतका बरोबर गेला कीं, मुलाच्या केसालाहि धक्का न लागतां वरील फळाचे मात्र दोन तुकडे झाले. हें कौशल्य पाहून सर्वांना मोठा आनंद झाला व मुलगा बापाला येऊन कडकडून

भेटला. परंतु जेसलरला मात्र या गोष्टीबद्दल मुळींच समाधान वाटलें नाहीं. त्यानें वुइल्यम टेलला विचारलें कीं, तूं दुसरा बाण घेतला होतास तो कशासाठीं ? यावर टेलनें असें उत्तर दिलें कीं, " माझा जर पहिला नेम चुकला, तर दुसरा बाण तुझ्या छातींत मारण्याकरितां मीं तो घेतला होता. " हें उत्तर ऐकून जेसलरचा क्रोध फिरून खवळला व त्यानें त्याला एका अंधारकोठडींत कोंडून ठेवण्याचा हुकूम केला.

## " जेसलर, हा पहा माझा देश स्वतंत्र झाला ! "

ज्या किल्ल्यांत त्याला अटकेंत ठेवावयाचें होतें तो तेथील सरोवराच्या पलीकडे होता. सबब त्याला आपल्या नावेंत घेऊन पलीकडे नेऊन स्वतःच किल्ल्यांत कोंडून ठेवण्याला जेसलर तयार झाला व त्याप्रमाणें ते नावेंत बसून निघाले. इतक्यांत भयंकर वादळ होऊन नाव खात्रीनें बुडते अशी स्थिति येऊन पोहोंचली. पण वुइल्यम टेल हा जसा तीर मारण्याच्या कामांत तसाच सुकाणूं धरण्याच्या कामांतहि फार वाकबगार होता; म्हणून त्याच्या हातापायांतील बेड्या काढून त्याला सुकाणूंवर बसविण्यांत आलें, व 'तूं सगळ्यांना सुरक्षित नेशील तर तुला मुक्त करूं,' असें जेसलरनें त्याला वचन दिलें.

वुइल्यम टेलनें वादळांतून ती नाव सुरक्षित आणिली. परंतु एके ठिकाणीं खडकाचें टोंक पुढें आलेलें होतें, तेथें नावेला पायानें हिसका देऊन व ती पाण्यांत दूर ढकलून वुइल्यम टेलनें किनाऱ्यावर उडी टाकली व तो जंगलांत नाहींसा झाला. नावेंतील बाकीचे सर्व लोक आश्चर्यानें चकित झाले व निरुपाय होऊन आपल्या किल्ल्याकडे जाऊं

लागले. या किल्ल्याला जावयाच्या वाटेंत एक भयंकर खिंड होती. दोन्ही बाजूंनीं कडे तुटलेले होते व झाडी दाट होती. या अरुंद वाटेंतून नुकतीच एका लग्नाची वऱ्हाडी मंडळी ताशेवाजंत्रीं वाजवीत पुढें चालली असल्यामुळें तो रस्ता बहुतेक अडून गेला होता. इतक्यांत जेसलरची स्वारी लव्याजम्यासह तेथें येऊन पोहोंचली. पुढें वाट करण्याकरतां कोणी प्रयत्न करीत आहेत, इतक्यांत एक अचूक बाण लागून त्याच्या वेदनेनें जेसलर आपल्या घोड्यावरून मरून खालीं पडला! तेव्हां त्याच्या लव्याजम्याच्या मंडळींत एकच गहजब उडून गेला, आणि हें कृत्य कोणीं केलें हें कोणालाच कळेना.

सभोंवतीं पुष्कळ मंडळी जमली पण 'जेसलर मेला' ही बातमी ऐकून सर्वांना आनंदच झाला. त्याच्यासाठीं कोणीहि रडेना. जो तो बरें झालें म्हणून म्हणूं लागला. त्याच्या छातींत लागलेला बाण उपटून काढण्याला कोणी मदत करीना; आणि हा एवढा मोठा अधिकारी मेला तरी पुढें जीं लग्नाचीं वाद्यें वाजत होतीं तीसुद्धां कोणी बंद करीनात. जुलमी राजा मेला म्हणजे लोकांना लग्नाप्रमाणें आनंद होतो असें दाखविण्याकरितांच कीं काय कोण जाणे तीं वाद्यें वाजत राहिलीं होतीं. त्या वेळीं सर्वांना अतिशय आनंद झाला, परंतु या आनंदाला कारण कोण हें मात्र कोणालाच कळेना!

इतक्यांत एका उंच खडकावरून गंभीर शब्दानें वुइल्यम टेल जेसलरला उद्देशून म्हणाला : "जेसलर, हा माझा बाण आहे! आजपासून तुझ्या जुलमांतून आमचा देश स्वतंत्र झाला!"

★

:: ३ ::

## युक्तीनें हल्ला करून किल्ले हस्तगत केले

वुइल्यम टेलनें ज़ेसलरला आपल्या बाणानें मारलें. परंतु तेवढ्यानें स्वतंत्रतेचें सर्व काम झालें होतें असें नाहीं. एक अधिकारी मारला तर त्याच्या ज़ागीं दुसरा अधिकारी येईल आणि तो कदाचित् पहिल्यापेक्षां जास्त जुलूम करील, अशी त्या वेळीं भीति होती! याकरितां जेथून असले अधिकारी येतात त्या ऑस्ट्रियालाच चांगली तंबी दिल्यावांचून आपल्यावरील जुलूम बंद होणार नाहींत, ही गोष्ट स्वित्झर्लंडमधील लोकांच्या लक्षांत आलेली होती. म्हणून ते त्या तयारीला लागले.

ऑस्ट्रियाच्या अधिकाऱ्यांनीं स्वित्झर्लंडमध्यें येऊन स्वतःच्या संरक्षणासाठीं म्हणून जे किल्ले बांधले होते ते त्यांनीं प्रथमतः हस्तगत करून घेतले व जमीनदोस्त करून टाकले. शिलरनें असें वर्णिलें आहे कीं, जेसलर मेला त्या वेळीं त्यानें सुरू केलेल्या किल्ल्याचें काम चाललेलेंच होतें; परंतु जे मजूर लोक इतका वेळपर्यंत जेसलरचा

ग्र. क्र. २६७५ वि.

किल्ला बांधीत होते त्यांनींच जेसलरच्या मरणाची बातमी ऐकिल्या-बरोबर वर चढविलेले दगड खालीं ढकलून देण्याला सुरवात केली. नशीब फिरलें म्हणजे अशा गोष्टी होऊं लागतात !

रॉसबर्ग या नांवाचा दुसरा एक किल्ला ऑस्ट्रियन लोकांच्या ताब्यांत होता व तो किल्ला नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं कांहीं युक्तीनें सर करून घेण्याचें कटवाल्यांनीं पूर्वींच ठरविलेलें होतें. त्याप्रमाणें त्या कामांतहि त्यांना यश आलें. त्या किल्ल्यांत कोणी एक सुंदर स्त्री नोकरीस असे. तिचें या कटवाल्यांपैकीं एका इसमावर प्रेम जडलेलें होतें व त्यामुळें त्या दोघांच्या रोज किल्ल्यांत गांठी पडत असत. ती स्त्री किल्ल्याच्या भिंतीवरून दररोज रात्रीं दोरीची शिडी खालीं सोडीत असे व तिच्यावरून चढून तिचा प्रियकर किल्ल्यांत जात असे. या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें हा कटवाला हल्ल्याचे दिवशीं रात्रीं वर चढून आला व त्यानें आपल्या पाठीमागून आपल्या-बरोबरच्या वीस साथीदारांनाहि त्याच रीतीनें वर घेतलें. नंतर ह्या सर्व कटवाल्यांनीं किल्लेदार आणि त्याच्याजवळ असलेले थोडेसे शिपाई यांना कैद केलें व तो किल्ला आपल्या हस्तगत करून घेतला.

या रॉसबर्गच्या किल्ल्याप्रमाणें सार्नेन हा दुसरा एक किल्ला ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांच्या ताब्यांत होता, पण तोहि स्वित्झर्लंड-मधील लोकांनीं दुसऱ्या एका युक्तीनें त्याच दिवशीं आपल्या हस्तगत करून घेतला. या किल्ल्यांत या क्रांतीच्या वेळीं लँडेनबर्ग हा अधिकारी राहत असे.

वर्षाच्या पहिल्या दिवशीं शेतकरी लोकांनीं कांहीं तरी नजर-नजराणे घेऊन आपल्या अधिकाऱ्यांकडे भेटावयाला जाण्याची तिकडे

एक चाल होती. तिचा फायदा घेण्याची कल्पना कांहीं कटवाल्या लोकांच्या मनांत आली. त्यांनीं सुमारें पन्नास असामी गोळा केले. सर्वांनीं शेतकऱ्यांचे पोषाख घातले व हातांत टेकावयाची एक एक काठी आणि डोकीवर फळफळावळ वगैरेच्या नजराण्यांनीं भरलेली एक एक टोपली, अशा तयारीनें ते सर्वजण किल्ल्याकडे गेले. किल्ल्याजवळ जाऊन पोहोंचल्यानंतर त्यांपैकीं तीस असामी जवळच्या झाडींत गुप्त रीतीनें दडून बसले आणि बाकीचे वीस लोक आपले नजराणे घेऊन लँडेनबर्गच्या भेटीसाठीं म्हणून किल्ल्यांत गेले.

या युक्तीनें त्यांचा किल्ल्यांत बिनहरकत प्रवेश झाल्यानंतर प्रत्येकानें आपल्याजवळ जें एकेक भाल्याचें पातें दडवून ठेविलें होतें तें बाहेर काढून हातांतील काठीवर बसविलें. इतक्यांत त्यांच्यापैकीं एकानें अतिशय मोठ्यानें शिंग फुंकलें.

तो खुणेचा आवाज ऐकल्याबरोबर जवळच्या झाडींत दडून बसलेले लोक किल्ल्यावर धावून आले व त्या सर्वांनीं मिळून रखवालदार शिपायांना कैद केलें व तेथील मुख्य अधिकारी लँडेनबर्ग यालाहि त्यांनीं पकडलें व 'आम्ही फिरून तुमच्या देशांत कधींहि पाऊल टाकणार नाहीं.' अशी त्यांनीं त्याच्याकडून शपथ घेवविली. अशा रीतीनें इतर ठिकाणचेहि किल्ले स्विस लोकांनीं कांहीं तरी युक्ति करून काबीज केले व जिकडे तिकडे स्वतंत्रतेला मोकळी वाट करून देण्यांत आली. स्वतंत्रतेची इशारत सगळीकडे पोहोंचण्याकरितां उंच टेकड्यांवरून लांकडाच्या राशी जाळण्यांत आल्या. सर्व देवळांतून आनंदाच्या घंटा वाजूं लागल्या. लहान मुलें उड्या मारूं लागलीं व

मोठीं माणसें परमेश्वराची प्रार्थना करूं लागलीं आणि आपला देश स्वतंत्र झाला याबद्दल सर्वांना आनंद वाटूं लागला !

## आल्बर्टचा खून आणि स्विस लोकांना शकुन

परमेश्वराच्या मनांतून एखाद्या देशाला स्वतंत्रता द्यावयाची असली म्हणजे तो सर्वच गोष्टी अनुकूल रीतीनें घडवून आणीत असतो, हें पुढील गोष्टीवरून चांगलें लक्षांत ठसण्यासारखें आहे. स्वित्झर्लंडमधील लोकांनीं आपल्या देशांत जें ऑस्ट्रियाचे लोक आलेले होते त्यांचा पराभव करून त्यांना बाहेर हांकलून दिलें होतें हें खरें, परंतु तेवढ्यानेंच त्यांची स्वतंत्रता पूर्णपणें कायम झाली असती असें नाहीं. अजून ऑस्ट्रियामध्यें आल्बर्ट राजा जिवंत होता; व त्याच्या अंतःकरणांत त्याची महत्त्वाकांक्षाही जिवंत होती.

आपण फिरून स्वित्झर्लंड ज़िंकूं आणि तेथील लोकांवर फिरून आपले जुलूम चालवूं, असें त्याला वाटत होतें. स्विस लोकांनीं जेसलरला मारलें म्हणून काय झालें ? जेसलरसारख्या दुष्ट अधिकाऱ्यांचा झरा ऑस्ट्रियामध्यें जिवंतच होता. त्याच्याकडे परमेश्वरानें जर वक्रदृष्टीनें पाहिलें नसतें, तर स्वित्झर्लंडची स्वतंत्रता कायम टिकली असती किंवा नाहीं, याबद्दल शंकाच आहे. स्वित्झर्लंडमधील बंडाची बातमी ऐकल्याबरोबर तेथील लोकांची खोड मोडण्याकरितां निघण्याची आल्बर्टनें तयारी केली. त्यानें अतिशय मोठें सैन्य जमविलें, व स्वित्झर्लंडवर तो चाल करून निघाला. परंतु रूस या नांवाच्या नदीच्या कांठीं त्याचा तळ पडलेला असतां त्याच्या एका जवळच्या आप्तानें त्याचा गुप्त रीतीनें खून केला आणि अशा रीतीनें

स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेचा भयंकर शत्रु पृथ्वीच्या पाठीवरून नाहींसा झाला !

## मॉरगॉर्टनचें यशस्वी युद्ध

परंतु आल्बर्टच्या पाठीमागून लिओपोल्ड ऑस्ट्रियाच्या गादीवर आला व त्यानें १३१५ मध्यें स्वित्झर्लंडमधील पहाडी लोकांची खोड मोडण्याचा फिरून एक जंगी प्रयत्न केला. लिओपोल्ड यानें सोळा हजार सैन्य जमविलें व त्याचे दोन भाग करून दोघांनीं दोन वाटांनीं स्वित्झर्लंडमध्यें प्रवेश करावा असें ठरवून त्यानें कूच करण्याला सुरवात केली. ही तयारी पाहून आतां स्वित्झर्लंडची स्वतंत्रता टिकत नाहीं, असें पुष्कळ लोकांना वाटूं लागलें. परंतु खुद्द स्विस लोकांना मात्र अजून तसें वाटत नव्हतें. आपण मरून जाऊं पण आपली स्वतंत्रता शत्रूच्या हातीं देणार नाहीं, असा त्या लोकांना पीळ होता. या लोकांची संख्याच थोडी होती. त्या मानानें त्यांनीं एकंदर तेराशें लोक जमा केले.

सोळा हज़ार सैन्यापुढें तेराशें लोकांचा वास्तविक काय टिकाव लागणार? केवळ आंकड्यांकडेच पाहिलें तर सोळा हजारांपुढें तेराशेंचा चुराडाच उडाला पाहिजे. परंतु देवाच्या घरीं हा संख्येचा प्रश्न नाहीं. जुलमी राज्यपद्धति आणि स्वतंत्रता यांचा हा प्रश्न आहे. जुलमाचे अन्याय आणि स्वातंत्र्येच्छु लोकांकडून त्याचें पारिपत्य, यांच्या झगडण्यामध्यें स्वातंत्र्याचाच नेहमीं जय झाला पाहिजे, असें परमेश्वराच्या घरचें धोरण इतिहासावरून स्पष्ट होत आहे. स्विस लोक जरी फक्त तेराशेंच होते, तरी

अनुक्रम ५५
विभाग

त्यांचें शौर्य स्वदेशाभिमानानें अतिशय उद्दीपित झालेलें होतें व त्यांना सर्व डोंगरांची आणि खिंडींची माहिती होती. लिओपोल्डचें सैन्य ज्या वाटेनें येणार त्या वाटेंतील एक अवघड खिंड या लोकांनीं रोखून ठेविली होती, व तेथें ते शत्रूची वाट पाहत स्वस्थ बसले होते. ते जेथें दबा धरून बसले होते त्या डोंगराला मॉरगार्टन असें नांव आहे व या मॉरगार्टनच्या खिंडींतच लिओपोल्डच्या सैन्याचा पराभव झाल्यामुळें या लढाईला मॉरगार्टनची लढाई असें म्हणतात. स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेच्या इतिहासांत ही लढाई फार प्रख्यात आहे. या ठिकाणीं एका बाजूला भयंकर डोंगर आणि दुसऱ्या बाजूला अतिशय विस्तीर्ण असें एक सरोवर असल्यामुळें तेथील खिंडीची वाट फार धोक्याची होती. तेथें लिओपोल्डचे घोडेस्वार आल्याबरोबर डोंगरावर बसलेल्या स्विस लोकांनीं त्यांच्यावर डोंगरावरील दगड ढकलून देण्याला सुरवात केली. त्यामुळें ते घोडेस्वार अगदीं गोंधळून गेले. आतां काय करावें अशा विवंचनेंत ते आहेत इतक्यांत स्विस लोकांच्या दुसऱ्या एका टोळीनें त्यांच्यावर आपली तलवार चालवून त्यांना मागें हटविलें. तेथें जी कत्तल झाली आणि जे लोक पळतां पळतां पडले, त्यांच्यामुळें तेथील खिंडीचा रस्ता भरून गेला. पुढें आलेले कांहीं घोडेस्वार मागें पळून गेले, त्यामुळें घोडेस्वारांच्या पाठीमागें असलेल्या पायदळामध्येंही फार घोंटाळा उडून गेला, आणि जो तो पळत सुटला. त्या सैन्याला थांबविण्याची सोय उरली नाहीं व इतरांबरोबर खुद्द लिओपोल्डहि पळून गेला.

सुमारें पंधराशें लोक त्या खिंडींत मरण पावले आणि तळ्यांत पडून किती मेले याचा तर पत्ताच नाहीं. अशा रीतीनें ही लढाई

सकाळीं नऊ वाजेपर्यंत आटपली. परंतु लिओपोल्डच्या सैन्याची दुसरी तुकडी दुसऱ्या वाटेनें स्वित्झर्लंडमध्यें शिरून नासधूस करीत होती. ही बातमी मॉरगार्टनच्या खिंडींत विजयी झालेल्या देशभक्तांना कळल्या-बरोबर ते तिकडे गेले. परंतु लिओपोल्डच्या हाताखालील आपल्या मुख्य सैन्याचा पराभव होऊन खुद्द लिओपोल्डहि पळून गेला ही बातमी त्या दुसऱ्या तुकडीला कळतांक्षणींच त्या सैन्यानेंही पळ काढण्याला सुरवात केली आणि स्विस लोकांनीं त्यांचा पाठलाग करून त्यांना आपल्या देशाच्या हद्दीबाहेर घालवून दिलें.

## स्विस लोकांचा संघ वाढला

हा विजय मिळाल्यानंतर पूर्वीं सांगितलेल्या तिन्ही कॅन्टन्समधील लोकांची ब्रूमेन येथें फिरून एक सभा भरली आणि पूर्वीं स्वतंत्रता मिळविण्याकरितां जशा त्यांनीं शपथा घेतल्या होत्या, त्याचप्रमाणें या ठिकाणीं ती स्वतंत्रता कायम राखण्याविषयीं तशा त्यांनीं शपथा घेतल्या. आपल्यापैकीं कोणत्याहि प्रांतावर शत्रूनें हल्ला केला तर त्याच्या संरक्षणाला सर्वांनीं जावें, बाकीच्यांच्या सल्ल्याशिवाय कोण-त्याहि एका प्रांतानें परकीय लोकांशीं तह वगैरे करतां कामा नये, आणि आपसांत कांहीं तंटा पडल्यास तो पंचांच्या निकालानें तोडावा; असे ठराव त्या वेळीं त्या लोकांनीं केले. येथून स्वित्झर्लंडच्या स्वतंत्र-तेला कायमची सुरवात झाली. या तीन प्रांतांची स्वतंत्रता आणि त्यापासून होणारी भरभराट पाहून आपणहि त्यांच्या कटांत शिरावें व स्वतंत्रतेचा उपभोग घ्यावा असें बाकीच्या प्रांतांना वाटूं लागून ते एकापाठीमागून एक त्यांच्या कटांत सामील होऊं लागले. ल्यूसर्न

आणि झूरिच हे दोन प्रांत लवकरच या कटांत मिळाले. नंतर त्या पांचांच्या कटांत ग्ल्यारिस हा सहावा आणि झग हा सातवा प्रांत मिळाला व त्यांचेमागून बर्न हा आठवा प्रांत त्या कटांत सामील झाला व अशा रीतीनें ही संख्या तेरापर्यंत वाढत जाऊन एकमेकांच्या मदतीनें सर्व स्वित्झर्लंड देश आपली स्वतंत्रता शेवटपर्यंत कायम राखूं शकला.

★

:: ४ ::

## झूरिच नागरिकांची स्वातंत्र्याची प्रीति

स्वित्झर्लंडच्या स्वतंत्रतेच्या इतिहासांतील कांहीं भाग मुख्यत्वें-करून स्वित्झर्लंडमधील पहिल्या तीन कँटन्सच्या कटाचा इतिहास आहे. परंतु तेथील लोकांत जी स्वातंत्र्याची प्रीति दिसून आली तीच स्वित्झर्लंडमधील इतर प्रांतांतीलही लोकांच्या अंगामध्यें भरलेली होती. सभोंवतालची परिस्थिति, लहानपणचें शिक्षण, वडील माणसांचे विचार, वाचण्याला मिळणाऱ्या पुस्तकांचें धोरण, वगैरे सर्व गोष्टींनीं तिकडील लोकांच्या मनांत स्वातंत्र्याची निस्सीम भक्ति उत्पन्न झालेली असते. आपल्याइकडील अतिशय प्रेमळ अशा भगवद्भक्तांची प्रत्यक्ष भगवंतावरदेखील भक्ति नसेल इतकी तिकडील लोकांची स्वतंत्रतेच्या कल्पनेवर भक्ति जडलेली असते. त्या स्वतंत्रतेसाठीं ते पाहिजे तें करण्याला तयार होतात; किंबहुना, ते आपले प्राणहि देण्याला मागेंपुढें पाहत नाहींत. आणि

त्यामुळेंच त्यांनीं ज्या स्वतंत्रतादेवीची इतक्या निस्सीमपणें आजपर्यंत उपासना केली आहे, ती त्यांच्यावर सदोदित सुप्रसन्न होऊन राहिली आहे.

तिकडील यःकश्चित् लोकांतसुद्धां स्वतंत्रतेची प्रीति किती भरलेली असते हें झूरिचच्या इतिहासांतील एका लहानशा गोष्टीवरून चांगलें लक्षांत येण्यासारखें आहे.

झूरिच हा स्वित्झर्लंडमधीलच एक भाग आहे. हा प्रांत बाकीच्या प्रांतांच्या कटांत सामील होण्याच्या पूर्वीं तेथील सामान्य लोक आणि सरदार लोक यांच्यामध्यें तंटे होत. या वरिष्ठ सरदारांचा जुलूम सामान्य लोकांना असह्य होऊन त्यांनीं तेथील सर्व राज़कीय सत्ता आपल्या हातांत घेतली होती. पण साळी, कोष्टी, तेली, तांबोळी, वगैरे सामान्य लोकांचें वर्चस्व झालेलें सरदार लोकांना पाहवत नव्हतें आणि म्हणून त्यांची सत्ता मोडून टाकण्याविषयीं त्यांचे गुप्त बेत चालले होते. रोडाल्फ ब्रॉन हा लोकपक्षाचा पुढारी होता व त्यानें आपल्या प्रांताची व्यवस्था चांगल्या रीतीनें चालविली होती. झूरिचमधील सर्वसामान्य लोक त्याजवर प्रीति करीत असत.

## म्युनिसिपल हॉलमधील चढाई

त्यांच्या ताब्यांतील झूरिच शहराला एकदां आग लावून टाकण्याचाच सरदारांनीं घाट घातला होता; परंतु तो बेत उघडकीस येऊन फसला. नंतर सरदारांनीं आपल्या पक्षाची जमवाजमव करून तें शहर

हस्तगत करून घेण्याचा दुसरा एक गुप्त प्रयत्न आरंभिला आणि एके दिवशीं संध्याकाळीं सुमारें सातशें यात्रेकरू लोक झूरिच शहरामध्यें शिरले. हे खरोखर यात्रेकरू असतील असें समजून कोणीं त्यांच्याकडे लक्ष दिलें नाहीं. परंतु कांहीं वेळानें त्यांच्याबद्दल शहरांतील लोकांना संशय येऊं लागला व हे सरदारांच्या पक्षाकडील गुप्त कटवाले आहेत अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं.

ती गुप्त बातमी एका होडीवाल्याला कळली व दुसऱ्या कांहीं कारणानें असाच संशय एका रोटीवाल्याच्या दुकानांतील एका नोकराला आला. हे जरी साधारण इसम होते, तरी त्यांना आपल्या प्रांताच्या स्वतंत्रतेची किंमत पूर्णपणें कळत होती. त्यांनीं ताबडतोब ती बातमी शहरचा मुख्य अधिकारी आणि लोकपक्षाचा मुख्य नायक जो रोडाल्फ ब्रॉन त्याला कळविली.

शहरचा जो मुख्य म्युनिसिपल हॉल होता त्याजवर रात्रीं एक वाजतां हल्ला करून तो काबीज करण्याचें कटवाल्यांनीं ठरविलें होतें व ती वेळ अगदीं जवळ येत चालली होती. कटवाले हल्ला करण्याला आणि लोकांची कत्तल उडविण्याला आपल्या म्यानांतील तलवारी बाहेर काढून अगदीं सज्ज होऊन बसलेले होते. एका क्षणाचाहि विलंब उपयोगी नव्हता. थोडा उशीर झाला तर झूरिच-ची स्वतंत्रता तेथील लोकांच्या हातून चालली होती.

अशा वेळीं रोडाल्फ ब्रॉन एका चाकरानिशीं घरून निघून म्युनिसिपल हॉलमध्यें येऊन पोहोंचला. त्यानें तेथें येऊन शहरांतील लोकांना जागें करण्याकरितां तेथील घंटा वाजविण्याला सुरवात

अनुक्रम

केली. घंटेचा घणघण आवाज शहरांत चोहोंकडे पसरूं लागल्याबरोबर सर्व लोक जागे होऊन म्युनिसिपल हॉलमध्यें जमा झाले. रोडॉल्फ ब्रॉन यानें त्यांना आपल्या स्वतंत्रतेवर कोणतें संकट प्राप्त झालें आहे तें समजावून सांगितलें; त्याबरोबर आपल्या स्वतंत्रतेच्या संरक्षणासाठीं ते हातांत तलवारी घेऊन लढण्याला तयार झाले. इकडे कटवाले लोक प्रथम रोडाल्फ ब्रॉन याच्या घराकडे गेले. परंतु तो घरीं नाहीं असें समजल्यानंतर ते सर्वजण म्युनिसिपल हॉलमध्यें आले. तेथें शहरांतील लोक त्यांचा समाचार घेण्याला तयारच होते. एकमेकांनीं एकमेकांना पाहतांच तलवार चालू झाली. जुल्माच्या शरिरावर स्वतंत्रतेच्या हत्यारांचे घाव पडूं लागले. एकमेकांवर आपटणाऱ्या तरवारी खणखण वाजूं लागल्या. रक्ताचे पूर वाहण्याला सुरवात झाली. वीरश्रीच्या आरोळ्या उठूं लागल्या आणि लढणारे योद्धे जखमा लागून जमिनीवर पडूं लागले. लोकपक्षाकडील योद्धे या प्रसंगीं जरी अतिशय निकरानें लढत होते तरी त्यांना खात्रीनें जय मिळेल असा संभव नव्हता. परंतु इतक्यांत शहरांतील खाटिक लोकांचे थवे ही बातमी ऐकून धांवत आले. दुसऱ्या दिवशींच्या बाजारांत लोकांना मांस पुरवण्याकरतां जनावरें कापण्याचें त्यांचें काम चाललें होतें. तेच जनावरांच्या रक्तानें लाल होऊन थबथबत असलेले सुरे हातांत घेऊन ती खाटिक लोकांची टोळी आपल्या स्वतंत्रतेच्या शत्रूवर धांवून येऊन तुटून पडली व तिनें जनावरांप्रमाणें शत्रूचीं माणसें कापून काढण्याला सुरवात केली. शत्रूवर असा दोहोंकडून मारा चालू झाल्याच्या योगानें त्यांची दाणादाण होऊन ते पळून गेले व झूरिचच्या लोकांची स्वतंत्रता कायम राहिली.

## सामान्य नोकराचा राष्ट्रासाठीं आत्मयज्ञ

पण ही गोष्ट एवढ्याचकरतां येथें सांगितलेली नाहीं. यांतील मुख्य रहस्य निराळेंच आहे. ही झूरिचची स्वतंत्रता या वेळीं कोणीं राखली ? त्याचा उल्लेख अद्यापि झालाच नाहीं. खाटिक लोकांच्या टोळीच्या शौर्याची कोणी प्रशंसा करतील आणि बहुतेक लोक रोडाल्फ ब्रॉन याला सगळें श्रेय देतील. पण वास्तविक तें श्रेय यांपैकीं कोणाचेंच नाहीं.

रोडाल्फ ब्रॉन हा जेव्हां त्या गुप्त कटाची बातमी ऐकून आपल्या घरून म्युनिसिपल हॉलकडे जाण्याकरतां निघाला, तेव्हां त्यानें आपल्याबरोबर एक नोकर घेतला होता. या नोकराकडे झूरिचच्या स्वतंत्रतेचें सर्व श्रेय आहे. रोडाल्फ ब्रॉन आणि त्याचा चाकर हे जेव्हां घरांतून निघाले तेव्हां चाकरानें आपल्या धन्याला एक-मेकांचे पोषाख बदलण्याविषयीं सुचाविलें.

चाकर म्हणाला : " तुमचा पोषाख मला द्या आणि माझे कपडे तुम्ही घाला. कारण वाटेनें अपघात होण्याचा संभव आहे. शत्रु तुम्हांला मारण्याकरतां टपून बसलेले असतील. त्यांच्या हातीं तुम्ही सांपडलां तर आपल्या शहराची स्वतंत्रता संपलीच. मी मेलों तर त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं. माझा देह स्वतंत्रेच्या कामीं उपयोगास येईल ! " असें म्हणून त्यानें आपले कपडे काढून धन्यापुढें ठेवले.

रोडाल्फ ब्रॉन यानें त्या वेळचा प्रसंग पाहून ते कपडे आपल्या अंगावर घातले व आपला पोषाख त्याला दिला व दोघेजण रात्रीचे म्युनिसिपल हॉलकडे जाऊं लागले. ज्यानें नोकराचा पोषाख घातला

होता तो सुरक्षितपणें म्युनिसिपल हॉलमध्यें जाऊन घंटा वाजवूं लागला.

परंतु ज्याच्या अंगावर झूरिचच्या अध्यक्षाचा पोषाख होता त्याची काय वाट झाली ?

हाच रोडाल्फ ब्रॉन असें समजून शत्रूंनीं त्याचे तुकडे तुकडे करून टाकले! परंतु त्या तुकड्यांनीं रोडाल्फ ब्रॉनला व झूरिचच्या स्वतंत्रेला वांचविलें!

यःकश्चित् नोकर लोकांच्या मनांतसुद्धां स्वदेशाच्या स्वतंत्रतेच्या कल्पनेचीं पाळेंमुळें इतकीं खोल गेलेलीं होतीं, म्हणूनच त्या देशांतील लोकांना स्वतंत्रतेच्या मधुर फळांचा रसास्वाद घेण्याला सांपडत आहे.

बाळाजी विश्वनाथ पेशवे दिल्लीहून चौथाईच्या आणि सरदेश-मुखीच्या सनदा घेऊन दक्षिणेंत येत असतां वेषांतर करून त्यांचें संरक्षण करणारे स्वतंत्रताप्रिय लोक महाराष्ट्रांत होते तोंपर्यंत महाराष्ट्रहि स्वतंत्र होतें.

परंतु आतां त्याचें काय ? जेथें निमकहराम लोक उत्पन्न होऊं लागले, तेथें गुलामगिरीच नांदली पाहिजे!

★

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा

स्वातंत्र्य-शाहीर " काळ " कर्ते

# शिवरामपंत परांजपे यांचें

# चरित्र

लेखक :

**वामन कृष्ण परांजपे, बी. ए., एल्‌एल्‌. बी.**

प्रस्तावना : गंगाधरराव देशपांडे

★

● शिवरामपंतांच्या नातवांनीं लिहिलेलें हें चरित्र असून त्यावर केसरी, लोकशक्ति, विविधवृत्त, मनोहर, प्रा. माटे इत्यादींचे अत्यंत सुंदर अभिप्राय आलेले आहेत. शिवरामपंतांच्या वाङ्मया-इतकेंच त्यांचें चरित्रहि हृदयंगम आहे.

**पृष्ठसंख्या ३२० : तीन रंगी कव्हर : शिवाय आर्ट पेपरवरील दहा चित्रें**

★

## *किंमत पांच रुपये*

व्यवस्थापक :

य. गो. जोशी-प्रकाशन-कार्या ... २.

IRBK-0102616

IRBK-0102616